# सृष्टीगंध

(निसर्गावरील कवितासंग्रह)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**सृष्टीगंध** (निसर्गावरील कवितासंग्रह)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : वैशाख कृ. १३ शके १९४७,
रविवार, दि. २५ मे, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-987974-6-9

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ २००/-

# समर्पण

निसर्गाच्या कुशीतच जगण्याचा खेळ,
त्याच्या सोबतीतच बसे रम्य जीवन खेळ
त्या सृष्टीला, त्या निसर्गाला ही कृती
कृतज्ञतेने समर्पित.

# मनोगत

पृथ्वीवर चैतन्याचा सळसळता स्रोत पाहायचा असेल तर सृष्टीकडे पाहावं. तिच्यातलं सौंदर्य, तिच्यातला मधुर नयनरम्य देखावा, तिचं फुलणं, उमलणं, तिचे ऋतूंचे नानारंगी, नानाढंगी सोहळे, तिचं वैविध्य, तिचा आल्हाद, तिचा प्रल्हाद, तिचा उत्साह, तिचा नाद, तिचा छंद सारं अतिशय दिव्य, भव्य असतं.

माझ्या मनाला सर्वात जास्त काय भावतं तर रसिकहो हा निसर्ग. याचं जगणं व जगवणं सारंच निराळं ! आपल्या अंगाखांद्यावर कणाकणाची काळजी घेणाऱ्या या निसर्गाला शब्दबद्ध करताना कोण आनंद होतो म्हणून सांगू ! खरं तर कोणतंही काव्य ठरवून कधीच होत नाही, ते आपसुक उतरतं ! निसर्गकाव्यात मात्र माझं मन मनापासून रमतं अन् रसिकांना आनंद देऊन जातं, यातच माझं समाधान दडलेलं आहे.

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | गवताचा शेला | ... | ७ |
| २) | पानोपानी मी राहीन | ... | ८ |
| ३) | मदनाचा भाला | ... | ९ |
| ४) | अथांग निळा सागर | ... | १० |
| ५) | पहाटेची जाग | ... | ११ |
| ६) | माझा कोकण मायाळू | ... | १२ |
| ७) | घर कोकणात माझं | ... | १४ |
| ८) | ही तडिता | ... | १५ |
| ९) | झाडी घनदाट | ... | १६ |
| १०) | छायाचित्र की चित्रची छाया | ... | १७ |
| ११) | वर्षाराणीचा सत्कार | ... | १८ |
| १२) | सांगावे की इतुके | ... | २० |
| १३) | प्राणांचा हा कोश | ... | २२ |
| १४) | जलपडदा सळसळतो | ... | २४ |
| १५) | होऊन धबधबा | ... | २६ |
| १६) | जगण्याची ही उर्मी अशी की | ... | २८ |
| १७) | गुलमोहर | ... | २९ |
| १८) | धुक्याची चादर आली | ... | ३० |
| १९) | चक्र ऋतूंचे | ... | ३१ |
| २०) | येता पावसाची सर | ... | ३२ |
| २१) | काळ्या निळ्या आभाळाची | ... | ३४ |
| २२) | माझं झोपडं सुरेख | ... | ३५ |
| २३) | झुडूप काटेरी | ... | ३६ |
| २४) | जळ चंचळ स्वभाव | ... | ३७ |
| २५) | आसराही वाहून गेला | ... | ३८ |
| २६) | थंडी भरलेला थाट | ... | ३९ |
| २७) | मन सोनेरी झालंया | ... | ४० |
| २८) | सृष्टी देते सुरेख दान | ... | ४१ |
| २९) | रंग वसन | ... | ४२ |
| ३०) | ही नाजूकता | ... | ४३ |
| ३१) | गवतफुलासम | ... | ४४ |
| ३२) | हिमगौर पर्वताने | ... | ४६ |
| ३३) | जिथे दाटली निशा | ... | ४७ |
| ३४) | गोरीमोरी धरा | ... | ४८ |
| ३५) | खळखळून हसताच कळीचे | ... | ५० |
| ३६) | वस्त्र धरेचे छान | ... | ५१ |
| ३७) | ताजेपण आंदण | ... | ५२ |
| ३८) | चित्र पहाटे | ... | ५३ |
| ३९) | बिंब हे | ... | ५४ |
| ४०) | लेणे हिरवेगार | ... | ५६ |
| ४१) | कत्तल माझी | ... | ५७ |
| ४२) | आभायानं उघडून दार | ... | ५८ |
| ४३) | झरे धबधबे | ... | ५९ |
| ४४) | ओझे दवाचे | ... | ६० |
| ४५) | गंध अत्तरे | ... | ६१ |
| ४६) | गवत कसे मोहरून जाते | ... | ६२ |
| ४७) | रानकेळी | ... | ६३ |
| ४८) | खडक विराण | ... | ६४ |
| ४९) | कवडसा | ... | ६५ |

५०) एक झाड आयुष्याचं ... ६६
५१) पिंपळ पानी मन उतरावे... ६७
५२) गर्द जांभळ्या फुलांवरी... ६८
५३) सुर्व्या रामाच्या पारी ... ६९
५४) गाव बुडालं ... ७०
५५) वाट गाभुळी गाभुळी ... ७१
५६) गेली नभात नारळी ... ७२
५७) आकाशाने
खेळली होळी ... ७३
५८) हा चंद्र अमृताचा ... ७४
५९) ढगांचा गालिचा ... ७६
६०) शुभरंगांनो ... ७७
६१) नभ घुसळून जाय ... ७८
६२) केशराचे झाड ... ७९
६३) वाट लाजली ... ८०
६४) कापसाचे बिस्तर ... ८२
६५) आज सांज म्हणे वेडी ... ८३
६६) सांज गुलाबी ... ८४
६७) एक वळण सुरेख ... ८६
६८) मन कमळ ... ८७
६९) स्वप्नामध्ये
गढली निशा ... ८८
७०) सुंदर स्वर्ग
इथेच देख तो ... ८९
७१) बहर केवढा अजोड ... ९०
७२) ब्रह्मांडाची उत्पत्ती ... ९१
७३) मी रानवाट ... ९२
७४) दोन क्षितिजे ... ९४
७५) मार्ग हिमगिरीपाशी ... ९५
७६) ऋतू भुईवर ... ९६
७७) वाटेवर भाळलेला ... ९७
७८) वाट ही अबोल ... ९८
७९) धुकाळलेली ही सकाळ...१००
८०) आलास का उन्हा तू ...१०१
८१) वांगं काटेरी ...१०२
८२) मीलनाचे साक्षी दव ...१०३
८३) स्वप्नं उमलले ...१०४
८४) नभ रंग तू ...१०५
८५) रंग तबकडी नभ ...१०६
८६) स्वप्नं इथे थांबले ...१०८
८७) मरमर राबण्याची ...१०९
८८) मंजुळ सूर असे ...११०
८९) नदी खळखळ वाहे ...१११
९०) अशी एक सांज ...११२
९१) मनी सणाचा गोडवा ...११३
९२) चित्रस्वर हे रंगती ...११४
९३) हासलेले मोती वेच ...११५



## (१)
## गवताचा शेला

ताज्या गवताचा शेला
अंगावर पांघरला
माती झाकली झाकली
तिनं ऋतू नवा ल्याला

त्यात अनोखा गारवा
अंगी उमटे शिरवा
शहारल्या रोमरोमी
पाचू गंधाने मारवा

तिचा चाले हा सोहळा
ताज्या गवताचा मळा
त्याची मखमल खाली
वसुंधरेला गुंडाळा

सोनउन्हाची तिरीप
कशी लाडात येऊन
खेळे हिरवळीसंग
लोळे झोकात येऊन

देह पहुडतो थोडा
दिनकर प्रभातीला
घेत विसावा मऊसा
पुन्हा जुंपतो कामाला

राती खेळतो चांदवा
त्याच्या चांदण्याची मौज
तृण चांदीत भिजते
त्याची शीतलते हौस

मग साखरझोपेत
शुक्र चांदणी भेटते
गवतास सारे सुख
आता मिळाले वाटते

दि. १४/०६/२०२०
सकाळी ७.५७ वा.



## (२)
## पानोपानी मी राहीन

पानापानात हिरवा पिवळा
रंग रेषांनी सजून गेला
रूप आपुले गोजिरे पाहून
त्यांचा आनंद गगनी गेला

रूप निरखावे कोठे हे
पान पानंच दर्पण झाले
किती सुंदरता आपुलीही
मन स्वतःस अर्पण झाले

जणू ललना ह्या सुंदर
उभ्या ऐटीत राहिलेल्या
आरशात पुन्हा पुन्हा
आपले लावण्य पाहिलेल्या

कुणी म्हणाली नितळ नभ
बघतंय पर्णकांतीला
गगनाच्या मनी येते
पानबुट्टीचा शेला धरतीला

की ह्या अदा तिच्या
भुलवती मला
राणी वसुंधराऽऽ
नभराजा हा पाघळला

मेघ होऊन ओघळला
मोती गळ्यातल्या माळा
दवबिंदूंच्या घे तुजला
प्रीतपानात हो गोळा

हास अशी तू गालात
खळ्या चुंबून घेईन
थेंब पावसाचे होत
पानोपानी मी राहीन

दि. १६/०६/२०२०
सायं. ०७.३० वा.



## (३)
## मदनाचा भाला

अंथरला गं कुणी गालिचा
मखमल पुष्पी रंगरंगीला
अवनी सारी सजून गेली
मनात साजन येऊन गेला

निळ्या जांभळ्या हिरव्या पिवळ्या
लालचुटुक धवल नि केशरी
गडद फिक्या साऱ्या साऱ्यांनी
रेखीव रांगोळीच रेखीली

आज धरेवर उत्सव आला
रंग निळा गगने पाठवला
म्हणे चंद्रमा ढवळा माझा
सूर्य देतसे केसर रक्तिमा

किरणे पिवळी फुलेच झाली
झाडांनी हिरवाई दिधली
रंग मिसळुनी गेले सारे
शाल जांभळी गुलाबी झाली

कितीतरी या मिश्र छटाही
पसरून गेल्या पाकळ्यांवरी
निसर्ग विणतो उंची शेला
दिला धरेच्या अंगावरी

खुलली खुलली अशी की भुलली
तेजाने तिचे रूप निखरले
रसिक गगन मग साजन होऊन
छत्र निळेशार तिजवर धरले

जो पाही तो दंगून गेला
सजली धरती गगनी गुलाला
आतून आले रंग पसरले
मदनाचा हा प्रेमी भाला

दि. ०४/०७/२०२०
सकाळी ०९.२३ वा.



## (४)
## अथांग निळा सागर

हा अथांग निळा सागर खाली
वर पसरून आभाळ निळाई
जळात मासे रंग निळेच
देव निळ्याच्या छटा अशाही

काय म्हणत हे असेल नभ की
जळी पहावे वाकून थोडे
आणिक सागर चिंतन मग्न
आकाशाचे विस्तरणे केवढे

नसे तरीही गर्व नभाला
विशालतेचा की उंचीचा
सागर धरील कसा अभिमान
विस्तीर्णता व गभीरतेचा

या माशांची वृत्ती चंचल
जीव स्वभावच सांगती ते तर
कधी स्थिर ना राहील मन हे
असेच भवसागरी हे कातर

काठावरती कितीक झाडे
सांगत असती अलिप्त व्हा रे
मुळे शोधुनी जगणे त्यावर
खोल जळातून बुडणे नसावे

सुंदर दिसतो भवसागर मग
कसे रोखावे मनास आपण
जलक्रीडा या वेगवेगळ्या
रमण्या त्यातच आग्रही मन

जळात राहून लिप्त न होणे
मग त्याला अध्यात्म समजणे
काठावरच्या त्या लोकांचे
आता म्हणणे होय उमजणे

रंग निळा या आभासाचा
खरे सत्त्व ही निळ्यात राही
नीलकंठ, नीलकांती कृष्ण ही
जीवन गुंतून त्यांतच ठेवी

नको मासळी बनून पोहणे
जन्मभरी मग तेच ते करणे
पडू जरा यातून बाहेरी
मुक्त स्वतःला निश्चित करणे

दि. १८/०६/२०२०
सकाळी ०८.३१ वा.




## (५)
## पहाटेची जाग

दिनमणी लालीम्याने
लालेलाल कसा झाला
झाली उषाही ही लाल
लज्जा पडदा पांघरला

मग नभ सारे झाले
लाल रंगात नाहले
दिशा साऱ्या लाल लाल
चित्र रक्तिम कोरले

वाटे सागराला हेवा
लाल रंग कसा घ्यावा
प्रतिबिंब आभाळाचे
त्याने लालीमा की द्यावा

आता सागराच्या उरी
नभ लाल ते केशरी
गंध लालसर झाले
आल्या केशराच्या सरी

पहाटेची जाग लाल
डोळे भिजती केशरी
रवी उदयास येई
तेज घेऊन सोनेरी

दि. २४/०६/२०२०
रात्री १०.४० वा.





## (६)
## माझा कोकण मायाळू

माझा कोकण मायाळू
बाप माय कनवाळू
त्याचं मन गरे गोड
संगे निसर्ग अजोड

माती पाणी ऊन वारा
कसा सुखाचा निवारा
विहीरीत बालपण
साऱ्या जगण्याचा थारा

असा पाऊस कोसळे
त्याची माया भारी इथं
मला भिजवून टाके
धार मुसळाची इथं

गंध मातीचा पसरे
त्यास सुवास पोफळी
आंबा महके तसाच
फणसंही गोड कळी

फुलं रानटी काटेरी
मन नाजूक तयांचे
दुःख विसरून मग
कसे हासणे तवाणे

घरं वेगवेगळाली
तरी मन एक इथे
सारे गाव एक घर
घरदार बोलणारे

कसा रमतो माणूस
माणुसकी हरीभरी
पोटापाण्यासाठी पोरं
होती चाकरमानी कीं

तरी गणपतीसाठी
सारी गावाकडं येती
सारा कोकण फुलतो
गोकुळाची सय व्हती

भाषा कोंकणी इथली
तिला गावरान माया
माय कोकणात ऱ्हाई
उतावीळ ती भेटाया

जरी राहतो शहरी
मन वाडीत हिंडतं
आंबा पोफळी नारळ
मनी फणस कोंडतं

शेत भाताची लगबग
दाणं ताटात पडती
त्यात तुपाची की धार
नदी गोरस दुभती

एकटं च बसावी की
जरा निवांत कुशीत
निसर्गची माय बाप
कसे येतात खुशीत

वारा झुलवी हिंदोळा
कानी बोले की पाचोळा
मनी पंचप्राण गोळा
असा सुरम्य सोहळा

दि. ०७/१२/२०२०
दुपारी १२.३२ वा.



## (७)
## घर कोकणात माझं

घर कोकणात माझं
पावसात निथळंत
स्वच्छ न्हातंधुतं होतं
ओला सुगंध ते देतं

सारी कौलारू हासती
स्नान करून बसती
पाणी ओघळत येते
मनी गुदगुल्या होती

दारी वृंदावन माझ्या
डोले तुळसही त्यात
श्याम आठवतो तिला
तेच वृंदावनी दिस

पुढे झेंडू नि शेवंती
फुलझाडांची बसंती
लगडून जातील की
साऱ्या फुलराण्या अती

स्वच्छ अंगणात आता
जरा टेकावे वाटते
चूल पेटली पाण्याची
धुरी आकाश गाठते

मन पावसाळी होते
कधी कोकणात जाते
भिजल्या घरट्याचा गंध
जरा हुंगून की येते

दि. २५/०६/२०२०
सकाळी ११.५३ वा.



## (८)
## ही तडिता

ही तडिता विद्युल्लता दामिनी
चमचमली गगनी
ऋतू वर्षावी सरीवर सरी
ही भेटण्यास आली अवनी

हिरवे हिरवे दुशालीतले
रम्य देखणे रूप क्षमेचे
पाहून उजळून देण्या आली
नभातुन वीजराणी प्रेम ते

फुले हासली दमकून उठली
हसली हसली वसुंधरा ही
आज सखी तिज भेटण्या आली
प्रकाश तनुवर लेऊन तीही

जलभरल्या जलदांनी केला
भुईवर सारा गुडुप अंधार
तेज शलाका होत कडाडे
आशा असते मनी निर्धार

कितीही असू दे पसरून गेला
तम साऱ्या या पृथ्वीवरती
आकाशातून एक प्रेरणा
चमचमून ती उजळून निघती

डोळे सारे दिपवून जाते
तेजस्वी अशी नभी चमकते
ही विद्युता मज सखी वाटते
मनातूनही उजळून निघते

दि. २६/०६/२०२०
सकाळी ०८.२१ वा.



## (९)
## झाडी घनदाट

झाडी घनदाट
डोंगर झाला हिरवागार
खाली अंथरलं तृण
हिरव्या पाचूचा शृंगार

डोलूनी वाऱ्यावर मस्ती
झाडांची चालली
उपवन राणी सजली
जणू उपवर झाली

तिच्या आनंदाचा गंध
दरवळे चहुदिशी
वेळ कसा जातो येथे
कळेना की पटदिशी

थोडे बसावे, हसावे
आणि पहुडावे इथे
मृदू स्पर्शाची जाणीव
खोल हृदयाच्या मध्ये

कधी वाटता एकटे
सोबतीस यांनी यावे
एक शब्दाविना सूर
मिसळून गाणे व्हावे

दि. २७/०६/२०२०
सकाळी ०८.३५ वा.



## (१०)
## छायाचित्र की चित्रची छाया

छायाचित्र की चित्रची छाया
उलटीसुलटी अशी ही माया
कसेही पाहा चित्र देखणे
असे वाटते जावे रमाया

एकांताचा गोड असा क्षण
टिपत जावा मनात कण कण
उगाच भटकंतीच्या वेळी
तिथेच बसून राहते मग मन

जळात नभ हे विशाळ उतरे
जळ गगनातून पुन्हा बरसते
दोघे पाहती बिंबा आपुल्या
परस्परांच्या रूप दर्पणे

मधे असे मग उभे राहता
प्रतिबिंबेची जळी पाहता
रंग एकसारखा दिसतसे
भेदा कारण तिथे नसतसे

उभी टेकडी मजा पाहते
मस्ती सारी साठवून घेते
एक दिवस तरी असा घालवू
जेथे दुःखचि विलया जाते

अशी रम्यता सुंदरता ही
मनास अवचित लाभून जाते
श्वासांमधुनी दिशाही दाही
चित्र अतुलनीय दाटून येते

दि. २७/०६/२०२०
सकाळी ०९.२७ वा.



## (११)
## वर्षाराणीचा सत्कार

एक डोंगर उभा की
होऊन युगे दाता
वरुणाला अडवितो
बनून त्याचा भाता
भात्यात विसावले
शर येती सर सर
इथं युगंधरेवर
वर्षाराणीचा सत्कार

कुठे कोसळे माथ्याशी
पाणी मुसळधारेने
आल्या पाण्याला दे वाट
डोंगर गा त्वरेने
विखुरलेल्या पाण्यास
एक मार्ग मिळे छान
खळखळून वाहतो
एक स्रोत होई सान
जसजसे येत जाई
पाणी पुढे वाहताहे
देण्याच्या गुणधर्मे
धबधबा हो महान

कर्तृत्व डोंगराचे
परि लोभ ना किंचित
जलजीवन तो देई
न राहण्या वंचित
पाण्याला अमृताची
चव येई हो त्या क्षणी
गोड, मधुर ते पाणी
चिर राहे अंतर्मनी

खेळे अल्लड ते कोणी
चिंब ओल्या बालपणी
जलक्रीडा त्या यौवनी
धुंद साजन सजनी
जिणे निसटून जाते
वाटे तीरी वृद्धपणी
कोणा काहीही वाटावे
पाणी पुढे वाहताहे
मग राबत्या हातांनी
भुई अंकुरत आहे
पाण्याचा होई दाणा
मुखात जातो जेव्हा
डोंगर, धबधबा
कृतकृत्य होई तेव्हा

काय सांगतो डोंगर
जे आहे सारे द्याना
देण्यात सारा आनंद
एवढंसं समजून घ्याना
दाता राहतो अढळ
उंच डोंगरासारखा
दानाचे पुण्य होऊन
होई दुःखाला पारखा

सारं देऊन डोंगर
होई सौंदर्याचा घाट
दनाने मिळे मान
सारे विश्व पाही थाट

---
---



## (१२)
## सांगावे की इतुके

कातळ पाषाणातून
कोंब कोवळा उगवे
नाजुक पानं त्याची
रंग कोमल जागवे

ऊनासाठी उंच जाई
पाणी कोठून ते घेई
खडक पाझरतो
आतून आई होई

कठोर त्याचं रूप
बाहेरून देखता
बीज हृदयी प्रेमाचं
आत वाकून पाहता

किती निंदा कोणी करी
म्हणे रुक्ष हा डोंगर
एक इटुकले रोप
करी त्याला हो सुंदर

पाहून बाह्यरूपा
करू नये कधी मत
आत मृदुसा कोपरा
असे प्रत्येकाच्या आत

तो जेव्हा पाझरतो
एक भाव जन्मा येतो
अपवादही असाच
गोंडस खूप होतो

रोपट्याला पाहताना
होई डोंगर हळवाना
आतली गुप्तगंगा
मुळाशी वळवाना

आधार स्वकीयांचा
बहरण्याला पुरेसा
डोंगराएवढा की
रोपाचा हो भरोसा

डोंगर रोपा पाही
हळूवारताही माझी
रोप डोंगरा पाहता
कणखर मुळ त्याची

एक चैतन्याची लाट
वाऱ्यावर डोलता
कष्टातुन उभा मी
कळे डोंगर बोलता

दूर अरण्यात गूज
चाले दोघांचेही रोज
साथ परस्परा देती
एक अनोखी ही मौज

कुठे जन्मलो हे नसे
महत्वाचे तितुके
कसे राखले जीवाला
सांगावे की इतुके

दि. २६/६/१९
रात्री ८.४३ वा.



## (१३)
## प्राणांचा हा कोश

दव पानावरचे
हसू गालावरचे
थेंब मोतीया
आनंदाचे

थेंब उजळतो
रंग पानाचा
रंग पान
देई थेंबा

एकरंगी प्रतिबिंब
पाहता
परस्परांना
तनी शिरवा

तरारून दव
तरारतेपण
पाना मिळते
आंदण दान

शिशिरातल्या
गळतीपूर्वी
मौक्तिक सालंकृत
कन्यादान

दव टपोर
भावविभोर
माया माहेराची
शिदोरी फुलविण्याची

दव रोमांच
साजनस्पर्शी
रतीराणीचे
लज्जाभाव

दव गर्भातील
जीव बुडबुडा
प्राणांचा हा
कोश लहान

दव चिमुकल्या
बाळ ओठीचा
लाडिक पापा
हळूच टिपा

दव रमणीच्या
गालावरती
टपटपणारे
मोती टपोरे

दव वृद्धपणी
आसुसलेपण
स्मृतिबिंदू
आधारखणी

ऐक दवा रे
थांबून जा ना
हृदय पाकळी
घे विश्राम

कधी न मिटशील
तेथून राजा
स्मृती राऊळीचे
परमधाम

दवात दर्शन
श्रीरामाचे
एक सोहळा
अति अभिराम

दि. २९/६/१९
सकाळी ८.५१




## (१४)
## जलपडदा सळसळतो

माझ्या पत्र्याच्या छतावरून
धारा पावसाच्या कोसळती
जलपडदा सळसळतो
विटा उन्हाच्या ढासळती

घर अंगणाला पाहतं
स्वच्छ न्हातं धुतं होतं
धूळ साचलेलं मळकट
पाऱ्यावाणी चित्र होतं

पडदा पाण्याचा हलतो
वारा धारेशी खेळतो
अंग चोरट्या लाजेनं
बुजऱ्या प्रियेला पाहतो

पडदा अवखळ राजस
हळू आत डोकावतो
रूप भिजलं निरखाया
खट्याळ रोज सोकावतो

घर राजसीला माहीत
त्याचं चोरून पाहणं
नजरेत तिला भरूनी
दृष्टिसुखानं वाहणं

छतावरच्या भांगातून
काळ्या भुऱ्या कुंतलातून
प्रीत धारेचा शेंदूर
टप् टप् मंत्रांचा उच्चार

ढोल ढगांचा वाजतो
नवरा पावसाचा सजतो
वाट पाहून थकलेल्या
सदन नवरीला भिजवतो

झाडं वेली फुलं पानं
आले वऱ्हाडी सजून
वीजबाई चमकून
घेते सुनमुख पाहून

पावसाचा लगीन सोहळा
देव ढगातून गोळा
धार फुलांचा वर्षाव
गळा गंधसूत्र घाला

धरती नटून हिरवाईनं
शालू पाचूचा लेवून
विहीण पंगत वाढली
फुलं रांगोळी काढली

धरणी विहीण गाऊन
लळा लावण्या विनवून
सांगे पाऊस जावया
प्रेम द्या हो बरसून

तुमचा वियोग न व्हावा
सुखानं करावा संसार
धान्य लक्ष्मी भरल्या
अर्धांगिणीला आधार
अर्धांगिणीला आधार

दि. ६/७/१९
दुपारी १२.३५ वा.



## (१५)
## होऊन धबधबा

होऊन धबधबा
कोसळू या जरा
झोकून उंचावरून
स्पर्शू या युगंधरा

विश्वास तिच्यावर
घेईल झेलून ती
माझे उनाडपण
सांभाळेल जी

ओघ पाण्यातला
ओढ वाहण्याची
मी न राहे माझा
मज त्वरा पाहण्याची

डोंगरकड्यावरूनी
स्वतःस सोडतो मी
कडा पायथ्यास ऐसे
कोसळून जोडतो मी

शुभ्र फेसाळत्या
धारा जणू दुधाच्या
उडती तुषार वेगे
क्षणवेळा मधुर मधाच्या

रव माझा मदांध भासे
भय रात्रीस आणणारा
शृंगार कोणी फुलवे
भिजताच ये शहारा

प्रियजनास कोणी
प्रेमात चिंब करते
माझ्यापरी तयांच्या
मन धबधब्यास ये भरते

मी कोसळून अंगावर
मनमोर रंगात आणतो
शीतल स्पर्श माझा
रोमरोमातही भिनतो

ओल्या तना मनाशी
संवाद निःशब्द होतो
भाव प्राजक्त तेव्हा
बोलून सारे जातो

किती लाजतात ललना
रती होत कामदेवाच्या
शृंगार शिखरी जातो
शिव झाकतो त्रिनयना

येथेच कोणा दिसती
ज्ञानाच्या शांती रेखा
तप चालते निरंतर
भंगण्याचा नाही धोका

मुनी ऐसे देखताच
लेऊन आत्मरस हा
मी होऊनी विरक्त
जगतात विरस ऐसा

कोणास वाटतो मी
अलंकार निसर्गाचा
अनमोल रत्नहार
घसरला की स्वर्गाचा

कोणास वाटतो मी
मंदाकिनीचा राग
येण्यास पृथ्वीतलावर
हा शाप की अनुराग

मी काहीच ना पाहतो
बस कोसळतो कोसळतो
होऊन धबधबा
भूचरणाशी लोळतो

आवेगे उसळता मजला
ती सांगे शांत वाहण्या
रूपे दोन्ही धावे माझी
नदी सागरास पाहण्या

दि. २७/६/१९
मध्यरात्री १२.०७ वा.




## (१६)
## जगण्याची ही उर्मी अशी की

खुडल्या फांदीच्या खोडावर
रूप चिमुकले झाडाचे
जगण्याची ही उर्मी अशी की
कौतुक वारस खोडाचे

कुणी चालवी कुऱ्हाड जेव्हा
झाड बहरले कोसळते
डोळ्यादेखत स्वमरणाने
धैर्य तयाचे ढासळते

किती वर्षांची घोर तपस्या
कोंबाला ते झाड बनवते
ऊन वारा पाऊस झेलत
सोशिकतेने त्याला तगवते

बहरू येण्या आयुष्य जाते
छाटण्यास क्षण एक पुरेसा
कृतघ्नतेने वार झाले तरी
सोडत नाही जीवन आशा

झाड संपुनी खोड राहते
चैतन्याची धार वाहते
एक कोंब हळुवार डोकवे
झाड बालपण पुन्हा पाहते

फुटता अंकुर झाडाला बळ
सोशिकतेचे मिळते ते फळ
नव्या रुपाला जन्मा घालून
खोड जनक हा होई सफळ

सारे संपले असे वाटता
अंतरातला कोंब जागवा
स्नेहधारेने रस पोसवुनी
पुनर्जन्म हा इथे जगावा

जगण्याची ही उर्मी अशी की
मरणालाही थारा नाही
जीवन अमूल्य बनवू असे की
झाडाकडून शिकू या काही
झाडाकडून शिकू या काही

दि. २६/६/१९
सकाळी ११.१५ वा.



## (१७)
## गुलमोहर

ग्रीष्मात बहरल्या गुलमोहराचा
आधार वाटतो केवढा
अंधाराच्या साम्राज्यातून
रविकिरण झळाळी एवढा

रंगांचा हा रम्य सोहळा
छटा केशरी लाल
झळा उन्हाच्या तप्त वाहत्या
तू गारवा सांभाळ

विराण आणिक ओसाड भवती
तरी तशातून फुलतो छान
एक रंग उधळून आपुला
बेरंगाची झुके कमान

गुलमोहराचे झाड एकटे
चित्र बोलके अर्थ महान
रंग एवढे कुठून आणतो
कलाकारा त्या नम्र प्रणाम

तपत्या ऋतूतुन बहरासन करी
अतुल्य यती हा असा पहा
जलथेंबही ना पंचक्रोशी
संयम त्याचा दृढ अहा

वस्त्र केशरी झोळी पाकळी
खांद्यावरती लटकून
जवळून जाता कुणी तयाच्या
दृष्टिसुखाची भिक्षा टाकून

संसाराची रखरख प्रेरक
संन्यासी अंतर्मुख हा
आत्मरूपाचे चित्र रेखिले
गुलमोहर फुलला की पहा

दि. २९/६/१९
सकाळी ८.१५ वा.




## (१८)
## धुक्याची चादर आली

धुक्याची चादर आली
धरा ही अर्धओली
पाहता दिसते काय
दृश्यं अदृश्य झाली

झाडावेलींवर हिमकण
फुलांवर दवबिंदूनक्षी
पाकळी यौवनात हसता
आनंदाचे भरते वक्षी

वाकते वेल लाजूनी
दवाच्या थेंबांचे भार
स्पर्श हा कोमलतेसव
अंतर्बाह्य गाऽऽर गाऽऽर

नभाला भरते येते
भुईवर प्रेमवर्षाव
धुक्याच्या तलम वसनाचा
पडदा हो त्याला अटकाव

लज्जेने चिंब ओऽऽली
धरणी ही आज झाली
वस्त्र ओढता धुक्याचे
उमटली गाली लाली

लाजणाऱ्या प्रियेला
गोड उपहार आणला
माळ मोत्यांची गळ्याला
प्रियतम अजून भाळला

प्रियकर प्रेयसी तेच
नव्याने भासती आज
शहारते अंग प्रत्यंग
लेऊनी लाजेचा साज

लावण्य कुठे दडले
प्रश्न मनाला हे पडले
रोजची धरा असूनी
अवचित असे कसे घडले

धुक्याने हळूच दूर केला
भवतीचा फापट पसारा
नजिकचे शिल्पसौंदर्य
अलगद येई आकारा...

दि. २८/६/१९
सकाळी ९.३२ वा.



## (१९)
## चक्र ऋतूंचे

हे चक्र ऋतूंचे ऐसे
परमेशाने निर्मियले
गर्वात बुडाल्या वसंता
शिशिराने भानी आणले

फळा पाना फुलांचा जेव्हा
बहर उतू हा गेला
फुंकर मारूनी त्यावर
वृक्षास निष्पर्ण केला

सालंकृत श्रीदेहाची
निरलंकृत काष्ठे होता
संयम खोडांतरीचा
झाडाला तगवीता

काळाचे बलशाली मग
चक्र फिरूनी येते
मृतप्राय लाकूड येथे
नाजूक पल्लव ल्येते

तो गर्भरेशमी शेला
अंगावर असा का आला
संपताही सारे सारे
आतून जीवनरस ओला

विरहिणी कशी जगते ना
शब्दात मांडणे नाही
देहावरच्या लेण्यांना
मरणयातना काही

पण येईल राजस माझा
आतुरतेने भेटाया
मीलनक्षण एक पुरेसा
उत्कंठा शिगा गाठाया

निःशब्द तपांच्या पोटी
शब्दसुमन रामायण
वेदना माय होऊनी
प्रकटती वेद ज्ञानायन

अभिशाप मानता याला
की वरदानाची भूमी
नास्ति नास्तिच्या घोषे
अस्तित्व जाणिले हो मी

दि. २८/६/१९
सकाळी ८.१६ वा.



## (२०)
## येता पावसाची सर

येता पावसाची सर
चिंता सरते की दूर
माझा बळीराजा धावं
शेतामंदी भरंभरं

शेत नांगरून झालं
आता पेरायाचं बीज
सर्जा राजा गणप्या हणप्या
लगबगीनं निघालं

न्याहारीची सय न्हाई
शिवारात लगीनघाई
आज धरती न्हातीधुती
गंध लेऊन सजली माती

बळीराजा गा खुशीत
खुशहाली त्यो पुशीत
बाप आभाळाचं रिण
बीज धरणीकुशीत

नांगरल्या शिवारात
कुटं चालली पेरणी
बीज बीज रोप होई
माझं मन हो धरणी

बीज मातीखाली जातं
सारं सपान फुलतं
बीज अंकुरण्या आधी
मन पिकाशी डोलतं

बैलजोड्या राबत्याती
माझी पोरंच ती हायती
साथ त्यांची या जीवाला
कशी जीवापाड नाती

दिनरात माझ्यासंगं
राबतोया शिरीरंग
नंदी शिवाचा बी दंग
कष्ट सुरात सारंग

त्याच्या कष्टाची बासुरी
आली घेऊनिया सरी
राग सरींचा मल्हार
त्यात लपली बागेश्री

हिरवा शालू भरजरी
तिच्या रूपा तरतरी
आता सर्गाची ही तोड
शेत लक्षुमी श्रीहरी

तिची किरपा घरीदारी
पसा पसा धान्य भरी
कणग्या भरून पावल्या
सुपात मुठी आल्या

जात्याचं चाक फिरलं
ओवीनं सुरा धरलं
पीठ परातीत मळता
दैन्य भूकेचं सरलं

चूल आज तेजाळली
भाकर तव्यावर आली
माझ्या कारभारणीची
खुशी फुलूनिया गेली

घरादाराच्या ताटात
घास मोतीयाचा आला
थेंब घामाचे गळता
चंदनाचा वास आला

अशी देवाजीची किरपा
साऱ्या माणसांवर ऱ्हावी
मिळो कष्टाची भाकरी
इडा पीडा दूर व्हावी
इडा पीडा दूर व्हावी

दि. १/७/१९
दुपारी १२.४५ वा.



## (२१)
## काळ्या निळ्या आभाळाची

काळ्या निळ्या आभाळाची आज
नियत दिसत नाही चांगली
धरेला धरलंय धारेऽऽवर
जीव लागलेत टांगणी

धारा मुसळाच्या फेकतोऽऽय
गारा टपोऱ्या मारतोऽऽय
गडगडाट कर्कश्श करूनी
विजेचं चाबूक ओढतोय

आज गड्याची दिसतेऽऽऽय
मर्जी खफाऽऽऽऽ
वाराही वाहतोय
सुसाऽऽट अस्साऽऽ

ढग उरलेत धरणीवर
योद्धा सैनिक ऐरणीवर
आभाळ फुटलंय तुफान सुटलंय
जोराऽऽचं पाणी पृथ्वीवर

आवरू कसं सावरू कसं
रडून पाणी वाढवू कसं
वाहिलं रे वाहिलं रे वाहिलं साऽऽरं
जलमय जलमय झालं बरंऽऽ

येवढाऽऽ राग, पाहिलाय आज
ढगापुढे ना कुणाचा आवाज
संकट असलं आणलंय की
निसर्ग कोपा मानलंय की

माणसा माणसा शहाणा हो
थांबव ऱ्हास चाललाय जो
निसर्ग मैतर होशील तर
सुखात झेलून घेशील सर

दि. ४/७/१९
सायं. ६.१० वा.



## (२२)
## माझं झोपडं सुरेख

रान हिरवाई मंदी
माझं झोपडं सुरेख
पुढं नदी वाहताना
प्रतिबिंबाला तू देख

झाडं डेरेदार उभी
देण्या सावली गडद
सुरामंदी पक्षी गाती
ऐक किलबिल नाद

गवतानं अंथरला
पायी गालिचा हिरवा
सुख स्पर्श त्याचा होता
मऊ लागतो गारवा

अंगावर धरणीच्या
भरजरी शालू आला
हिरव्या कंच मऊशार
धाग्या धाग्यानं विणला

सोनसळी ऊन येता
हिरवळ चमकते
भुई अंथरले तण
तरारून दमकते

शेत पिकल्या रेघात
सरळपण ते ओघात
वाट वाकडी कशाला
निसर्ग न माणसात

शांत निवांत पाण्यात
होडी ढकलावी आत
सृष्टीसंग विणू या की
घरटं सुगरणी नातं

दि. ५/७/१९
सकाळी ७.३७ वा.




## (२३)
## झुडूप काटेरी

झुडूप काटेरी
आज दिसतंय चंदेरी
काय किमया झालीया
दिस पुनव ल्यालीया

आभायातल्या चांदण्या
जरा फिराया आल्यात
पावसाच्या सरीसंग
चांदण्यात नहाल्यात

गोऱ्या गोऱ्या गालावर
खळी दवाची पडलीया
साडी काट्यात रुतून
सोडविण्यास अडलीया

काटा शहारून आलाय
हिव अंगामंदी भरलाय
दव राणीच्या संगतीनं
काटा बोचायचं भुललाय

सर सरसर बरसून
उगा निवांत बसलीया
एका काटेरी झाडावर
रत्नमाळ ही कसलीया

दि. २/७/१९
रात्री १०.०३ वा.



## (२४)
## जळ चंचल स्वभाव

संथ वाहताना मला
लाभतो शांत भाव
किती लहरी उठती
जळ चंचल स्वभाव

तरी लाभते वळण
एका वळणवाटेला
लहरींचा जोर कमी
शांत झुडपे तीराला

शांत स्वच्छ माझ्या जळी
प्रतिबिंब सारे शांत
झाडं झुडपे मौनात
परिसर हा निवांत

कधी बोलण्या स्वतःशी
अशी शांतता हवीशी
आत डोकावून पाहू
शोधू स्वतःला नवीशी

दि. १/७/१९
सायं. ८.१४ वा.



## (२५)
## आसराही वाहून गेला

शोधू कुठे निवारा
उघड्यावर संसार आला
वेड्या पिश्या पाण्याच्या सोबत
आसराही वाहून गेला

आधीच दारिद्र्य माझे
आता जगादेखले झाले
फाटके लुगडे नि कपडे
धाग्या धाग्यात ओले झाले

भांडीकुंडी सारी उपडी
माझी निजून गेली झोपडी
नवा कुठून टाकू तंबू
अन कुठं आता मी थांबू

पोरं बाळं भांबावलेली
त्यात भुकेनं घाई केली
चूल पावण्या पाण्यासंगं
बघा वढ्यात फिराया गेली

आता दगड मांडू तरीबी
पीठ कुठून आणायाचं
झोळी फाटलेली की होती
आता नशीब फुटून गेलं

कुणी उपकार करा की एवढं
माझं झोपडं उभारा तेवढं
घास भरवाया राब राब राबीन
आज पोरांना कुठं मी निजवीन

गेलं सुदाम्याचं घर वाहून
येरं माधवा लवकर धावून
लाज पोह्याची राखशील का तू
दाना मुखात टाकशील का तू

माझ्या डोळ्याच्या यमुनेला पूर
राहू नकोस तू असा दूर
या झोपड्यात ऱ्हाईचास तू बी
लगबगीनं ये बिगी बिगी

दि. ३/७/१९
सायं. ७.०९ वा.



## (२६)
## थंडी भरलेला थाट

झुंजूमुंजू रानामंदी
आज धुक्याची पहाट
वाटेमंदी निसर्गाचा
थंडी भरलेला थाट

घरं पांघरून उभी
धुकं भरली चादर
सारे घरात गुडूप
नाही कोणाचा वावर

सुर्व्या थोडा झाकलेला
उन्हं गाळून येत्यात
सोनसोनेरी किरणं
थंड चंदेरी होत्यात

झाडं झाडं शहारली
पानं पानं मोहोरली
बैलगाडी तशातून
घुंगुरानं हंबरली

घर सोडावं वाटंना
थंडी गुलाबी दाटली
जरा थांबा की हो आज
कारभारीण हट्टली

घरधनी माझा रोज
पहाटंला निघ रानी
कधी निजावं की त्यानी
सुख माझं पांघरूनी

दाणा दाणा पिकविता
ऊन वारा पाऊसही
शिरशिरल्या थंडीत
घाम वाहे अंगातुनी

सुख कशात गं माझं
ऐक सांगे तुझा स्वामी
मिळो भाकर जेवाया
राहो उपाशी ना कोणी

ऋतू असू दे कोणता
धनी राहू दे राबता
अन्न पिकविण्याविना
वसा कोणता पुण्याचा...

दि. ७/७/१९
सकाळी ११.३५ वा.



## (२७)
## मन सोनेरी झालंया

उन्हं पांघरून रान
पुन्हा नवं की झालंया
सोनसकाळ आलिया
मन सोनेरी झालंया

कवडसा आधी आला
आली उषा त्याच्यामागं
तिनं पायघोळ झगा
नेसला की झगमग

रातीचा त्यो अंधार
झाला गुडूप कवाच
एक आशा संगतीनं
तिनं आणली मनात

झटकून आळसाला
रान लागलं कामाला
वनचरे निघाले की
घास गोड शोधण्याला

पान पान जागं झालं
सळसळून डुललं
वेली राण्या झाडासंगं
संसारी फूल आलं

झोपलेलं रान व्हतं
किर्र्रर्र किड्यांच्या सुरात
आता सुर्व्या बघून
पक्षी गायन भरात

एक चैतन्याची लाट
आली तनात मनात
दूरवर नारायण
तरी रोज अंतरात

दि. १०/१०/१९
सकाळी ११.३० वा.



## (२८)
## सृष्टी देते सुरेख दान

ही फुले की पाने सुंदर
रंग तयांचे मोहक छान
किती नक्षीचे काम करूनी
सृष्टी देते सुरेख दान

या पानांनी रंग गुलाबी
गडद नेसला पानोपानी
रीत काढली मोडीत बघ ना
हरित रंग सोडून तयांनी

जशी सुंदरी वसन भरजरी
शालू अथवा नेसे पैठणी
त्या पानांनी काठावरती
श्वेत किनार ही घेत कोरूनी

चंदेरी ती नाऽऽगमोडी
रजत फुलांची लेस जोडली
चमकून उठला रंग गुलाबी
गुलाबी ऐशी जादू घडली

उगा वाटते कुणीतरी हे
दवबिंदू मग काठी ओवले
रांगेमध्ये बसून ते तर
पानाच्या रूपास भाळले

किमया ऐशी घडे सारखी
निसर्ग वेडा कारागीर
रसिक थबकतो ना नवलाई
थांबून थोडा पाहे फकीर

दि. १६/१०/१९
सकाळी ११.४७ वा.



## (२९)
## रंग वसन

कुंचला फिरला पहाटे
चित्रकाराचा जरा
उजळुनी प्राची दिशा
रंग वसन भरजरा

मिसळुनी रंगात सारे
रंग नाचू लागले
आज तेही गात वेडे
फेर घुमूही लागले

हा आला बघ रंग केशरी
पिवळाधमक अन् तांबडाही
एक गुलाबी रंग त्यातच
मिसळुनी जाय अंबरी

आकाशी रंगाने थोडे
काढले की डोके वर
मोरपिशी मग रंग बसला
सजुनिया त्याच्याच वर

पांढऱ्या मोतीया रंगा
आज शोभा चांगली
सावळ्या हरीनेही आपुली
कृष्ण प्रभा मग टांगली

जांभळ्या रंगात न्हाऊन
कुंचल्याचा फटकारा
आभाळ दालन रंगारंगी
मेघमालेवर शहारा

हात ना दिसती तयाचे
चित्रकारही गूढ हा
नानारंगी रंगलेला
सृष्टीकारही मूढ हा

रंग ते स्वर्गातले का
असती केव्हा न्यून की
उतरुनी नभ अंगणी तो
निरखतो भुई सुंदरी

बंध त्याचे जोडलेले
रोज ये कृती घेऊनी
दाद देतेही धरा तो
चित्र रेखी स्व लपवुनी

गुप्त स्वतः राहुनी
कृती मांडतो आपुल्या पुढे
कार्य कारण भाव जाणून
क्षणक्षणा प्रचीती घडे

दि. १९/११/१९
सकाळी १०.५४ वा.



## (३०)
## ही नाजूकता

ही नाजूकता अशी दिसावी
फुला पाकळीतून उमटावी
तलम पारदर्शी इतुकी की
थेट मनाला भिडून जावी

मन हलके हलके हे भावुक
दुजा मनाशी होत एकरूप
चेतन कोणी असो अचेतन
क्षणात होऊन जाईल समरूप

नाजूकता इतकी ते घेईल
कुठेतरी जरी दुःख कुढेल
या हृदयातून ऐक हुंदके
स्वतः ते बघ इतके रडेल

कधी कुणी असता समाधानी
ढेकर देईल मन अभिमानी
आनंदाने उठती फवारे
तुषार इकडे, शीतल वारे

कुणी न सांगता कळेल सारे
व्यथा असो वा मोद भरारे
जगणे परके नसेल तेव्हा
एकदिलाचे अनुभव व्हा रे

ही नाजूकता पाषाणाच्या
छाताडावर नाचनाचूनी
पाझर फोडेल, तो वितळेल
द्रवुनी तयाचे मन विरघळेल

असुर भावना जाय लयाला
सुरवर माणूस इथेच होईल
हृदयपाकळी कोमल कळी
पृथ्वीवरती स्वर्ग उभारेल

दि. २६/११/१९
सकाळी ६.०३ वा.



## (३१)
## गवतफुलासम

गवतफुलांशी बोलून आले
काल तिन्ही सांजेला
डोलून, डवरून सांगून गेले
गुज मनीचे मजला

रोज सकाळी उन्हात भिजूनी
शक्ती नवी घेता
दिसभर चैतन्याशी आम्ही
सदोदित खेळता

कधी ही आमुची रानफुले
तर कधी तुरे उगवती
उन्हं, सरी पावसाळी आणिक
शिरशिरी थंडी घेती

दिसभर सूर्य जसाही फिरतो
त्या उन्हासवे उजळतो
वाऱ्यासंगे डोलून डोलून
रानाशी बोलतो

कधी उन्हाशी लपाछपी
तर कधी वाऱ्याशी गप्पा
कधी देतो मग इवल्या फुलाला
हळूवारसा धप्पा

असे कितीसे वेगवेगळे
खेळ आम्ही मांडतो
ना रुसतो ना फुगतो
आम्ही नाही कधी भांडतो

गवतपाती ही आमुची आई
'खाऊ' आम्हाला देते
तिच्या अंगावर हुंदडतो, ती
मस्ती साहून घेते

सायंकाळी तिच्या कुशीतच
अलगद पहुडताना
स्वप्नातही ती थोपटते
गीत अंगाई गाताना

आम्हीही जगतो क्षणाक्षणाला
चिंता उद्याची नाही
जगणे दुसरे काहीच नसते
क्षणास फुलवत जाई

गवतफुलांचे गूज जाणुनी
मीही नव्याने शिकले
चिंता काळज्या सोडून देऊन
गवतफुलांचे ऐकले

आता मी सारे ऋतू पाहते
सेवा मज करताना
सृष्टी सारी सुखसोहळे
माझ्याचसाठी भरताना

दिलखुलास माझे हसणे, बसणे
आणिक जगणे आता
मी हलके हलके गवतफुलासम
होऊन जगणे आता

दि. २४/११/१९
सकाळी ०८.११ वा.



## (३२)
## हिमगौर पर्वताने

हिमगौर पर्वताने
पांघरून नीलवस्त्र
नभ निलायम वरती
निलकांती ही सर्वोत्तम

हा खंड चित्राचा काही
अथवा हे शिल्प अतुल्य
शीतलता अंगावरती
सौंदर्य असे हे अमूल्य

या निळ्या पांढऱ्या छटांनी
कोवळी सकाळ पाहताना
तो सूर्यही अडखळतो ना
वसन उषेचे विणताना

हे उंचवटे पृथ्वीचे
की नजरसुखाचे भाग्य
रजत निळाई तिजला
बहाल करती सौभाग्य

मी कुठे मनाला ठेवू
की वर गगनाला पाहू
अथवा नभांगणातून
सुंदरता साठवून घेऊ

शब्दही पडती अपुरे
ही सुरेख सुरगोपुरे
वर्णिण्या प्रतिभा कोठे
कुंठित सामर्थ्ये सारे

दि. ३/१२/१९
सकाळी ६.४१ वा.



## (३३)
## जिथे दाटली निशा

आकाशाने भाळावरती
केशरी टिळा रेखिला
रोज प्रभाती सृष्टीने
अध्यात्म उदय देखिला

अजून कोवळा सूर्यबाळ हा
रंग गोजिरा लेऊन
अष्टगंध जणू उधळीत चाले
रक्तचंदने घेऊन

ब्रह्मचर्य हा पाळत असतो
संन्याशाची छटा
दिनमणी तेजप्रकाश घेऊनी
कांती देत एकटा

तहानलेला बाळरवी हा
अर्घ्य प्राशितो अवघे
चंडप्रचंड ऊर्जेने ती
लाही काहिली होई गे

नजरेमधुनी साठवून त्या
देखदेखण्या बिंबा
एक तेज उदयते अंतरी
चैतन्याची गंगा

रोज पहाटे भेटून त्याला
नमन करावे नित्य
प्रकाशमय तो करतो जीवन
स्वागत व्हावे अगत्य

एक सूर्य बघ होता येईल
जिथे दाटली निशा
तळपत राहू पसरीत तेजा
मनी आशेची उषा

दि. ४/१२/१९
सकाळी ६.२९ वा.



## (३४)
## गोरीमोरी धरा

भुई झाकली हरिततृणाने
पोपटी हिरवा रेशीम शालू
स्पर्श तयाचा इतुका मऊसर
गोरीमोरी धरा लाजाळू

तिने ओढला वृक्षराजीचा
घनदाटी हा पदर मुखावर
तरीही लाडिक राजस तिजला
त्यातून वाकून पाहतो दिनकर

दृष्ट न लागो माझीच तुजला
इतुकी दिसशी गोड मोहिनी
मीही ऊब ही देत प्रेमाची
संयम राखीत येतो जवळी

उन्ह कोवळी अंगावरती
फिरतील राणी, तू रोमांचित
फुले शहारा मज अंगावर
मीही सदैव तुजला अंकित

रोज सकाळी प्रणय सांगतो
मी तुजला बघ अनुनयातून
तुझ्या पाठी मी चालत राहीन
उजळीत तुजला किरणावळीतून

थांब सखे मज जाणून घे ना
तुझे सारखे संकोच हे ना
कसा किती मी अधीर राणी
तरीही मर्जी तव ओलांडीन ना

रोज तुझ्यावर प्रेम बरसवीन
कांचनतेजी मढवून टाकीन
तुही सुंदरी अलौकिक, मज
केवळ बघता मोहित मी रोज

असे आपुले युगायुगांचे
प्रेम पाहते विश्व आगळे
मी तुझा नि तू माझी सदैव
हे का सांगणे पुन्हा वेगळे

विश्व तुझे फिरे भवती माझ्या
तुझे हे असणे सुखावे मजला
ऋतुही सारे दिमतीला तव
चंद्र तारका मीही तुजला

दि. ५/१२/१९
सकाळी ७.५३ वा.



## (३५)
## खळखळून हसताच कळीचे

खळखळून हसताच कळीचे
फुल एवढे सुंदर झाले
एक अनोख्या रंगांचे ते
झाडावरती झुंबर झाले

तिथे पेटले दिवे उजेडी
वाऱ्यावरती झुलती वेडी
अशी लावण्ये बहरा येऊन
मनास लावीत जातील गोडी

झुंबर हे की अतिशय नाजूक
स्पर्श कोवळे सुगंध साजुक
परमेशाची कलाकुसर ती
उद्यानातून जाऊ मोजुक

जो जो जवळी जातो आपण
खुलून येतील चैतन्याने
क्षणात आपण फुलून येता
खुदकन हसतील मोदभराने

आकाशाची घेत प्रेरणा
लटकून झुंबरे दिनकर निशिकर
हिरवी फुलझाडेही प्रेरित
लटकून फांदीवर कुसुमाकर

किती उत्सवांना ही सृष्टी
रोज मनवते रंगारंग
दृष्टी उघडून खुले करावे
दडून बसले अंतःकरण

दि. १३/१२/१९
सकाळी ६.३४ वा.



## (३६)
## वस्त्र धरेचे छान

फुले गुलाबी, फुले जांभळी
वस्त्र धरेचे छान
महावस्त्र हे देऊन तिजला
ऋतू करती तिचा सन्मान

रंगसंगती खुलवीत नेते
रूप तिचे अजूनच देखणे
वस्त्र असे नेसून मनभावन
तिने सुखाचे क्षण वेचणे

निसर्ग विणकर अतुल्य ऐसा
मास चार तो विणतो शेला
कशिदा काढून रंगरंगीला
सुवास ओतप्रोतही भरला

अशी संगती रंगांची की
परस्परांना शोभीत करती
कुठून एवढ्या छटा हा आणतो
पराग त्यातून तुरेही वरती

अशी नक्षी अन अशी जरदोजी
आकर्षक जरतारी किनार
इतुके सुंदर वस्त्र वेगळे
विलोभनीय ही दिसते नार

वेगवेगळ्या रंगफुलांच्या
साड्या, शेले, शालू खुमार
मस्त नटूनी नभदर्पणी ती
निरखून घेते निज शृंगार

स्त्रीच्या सौंदर्याला खुलवीत
तेजाळून वस्त्रालंकार
रूप देखणे पाहण्या प्रियकर
असे किती देतो उपहार

दि. २०/१२/१९
सकाळी ७.१५ वा.



## (३७)
## ताजेपण आंदण

या हिरवाईला
ताजेपण आंदण
प्रसन्न लहरी फेकीत
पाचूचे कोंदण

आतबाहेरी हरित संपदा
दृष्टिरम्य चित्रात कुंचला
एक रंग पोपटी तो हिरवा
सारे रंग फिके तो केवळ बरवा

हिरव्या नवलाईचे हिरवे
स्वप्न पाहता असे दिसेल
स्वर्गही इथल्या जळात हिरव्या
प्रतिबिंबा पाहून गोड हसेल

उगाच इथल्या गवतावरती
टेकवून कुडी पडल्यावरती
निवांततेचा सर्वांगाला
स्पर्श जानवे हिरवी धरती

सारे सारे सुरंग विरूनी
हिरव्या रंगांचे दालन
झाडेवेली, पानेफुले अन
जलप्रासादी हिरवे घोळण

तनही हिरवे मनही हिरवे
हिरव्या हिरव्या भावना
हरितपोपटी ऐश्वर्याच्या
गोंदून घ्याव्या चांदण्या

दि. १७/१२/१९
सकाळी ९.३७ वा.



## (३८)
## चित्र पहाटे

पृथ्वी आप तेज वायू आकाश
पंचमहाभूतांचे विश्व
पृथ्वीवरती जल राहतसे
आकाशी तो तेजोगोलक

वायू यांच्या मध्ये फिरतो
दूत बनून सांगावे घेऊन
तिन्ही त्रिकाळी चित्र वेगळे
सौंदर्याला घ्यावे पाहून

तेज सांडते पाण्यावरती
पाण्याला सोन्याचा रंग
डोंगरा आडून वाकून पाहतो
धरा राहते त्याने दंग

असा खोडकर सूर्य रोजची
लपाछपी त्याची असते
एक न जागा साऱ्या दिशांना
तेज देण्याची घाई दिसते

रोज सकाळी तो दिसतो
जगण्याची जणू संधी तो
शांत पहुडता निशीसमयीला
चंद्राला तो पाठवतो

जगणे म्हणजे काही न दुसरे
या पाचांचा खेळ असे
वारा आकाशातून शरीरी
आकाशातच झेपतसे

तो आहे या शरीरी आपण
रोज भेटू या उत्साहाने
चित्र पहाटे उदयाचलीचे
नेत्री साठवू नवरंगाने

दि. २१/१२/१९
सकाळी ७.१६ वा.



## (३९)
## बिंब हे

बिंब हे तेजाळुनी
शिवपिंडीवरती वाकले
बिल्वदल होऊन थोडे
नेत्र दोन्ही झाकले

तेजोगोलक हा प्रभाकर
शिवसाधनी रमला पहा
शंकराचा होत किंकर
तेज द्विगुणित ते अहा

देखणे ते बिंब त्या
शिवपिंडही स्वीकारते
तेजासवे जी आरती
किरणाकरे साकारते

नंदीही स्वामीपूजेने
नंदतो आनंदतो
थांबूनी थोडा निवांत
शिंगातुनी त्या सांडतो

ते सूर्यगोलक बिंब त्याच्या
शृंगमध्या सांधते
मस्तकी धरताच त्याने
शिवतेज कानी सांगते

मी तेज पसरीत जातो पण
ते तेज मृत्युंजय सदा
तो शरीरी नांदतो अन्
काळही बघ लांब हा

सहजी कोणी हाती घेऊन
रोपटे इवले जरा
कलिका असता सोबती
मम पुष्पबिंब फुलते पहा

चित्र भासात्मक तसे
मी वाटते जवळी आलो
हाती माझ्या तेजकलिका
क्षणभरी मीही भूललो

जाणतो मी जाणिले
शिवतत्त्व अंतर्बाह्य जे
कृतार्थ मी नारायण
त्रिनेत्री मजला स्थान हे

ते चराचर गम्य आहे
मिळविणे दुर्दम्य आहे
रोज झुकुनी गायिलेले
ज्ञान शाश्वत रम्य आहे

दि. ३०/१२/१९
दुपारी २.३१ वा.



## (४०)
## लेणे हिरवेगार

हे डोंगर की पाचूचे सुंदर
लेणे हिरवे हिरवेगार
खंडर होते इथे एकदा
कुणी कधी सांगू शकणार

कातळ उंच खडक पोसले
दरीदरीतून निराश बसले
उदास साऱ्या परिसराला
वर्षावाचे स्वप्न दिसले

डोंगर स्वप्नी भिजून गेला
कडे कपाऱ्या चिंब जाहल्या
दऱ्या दऱ्यातून स्रोत वाहिले
क्षणात खळखळ नद्या वाहल्या

हिरवे डोंगर सजली धरती
आकाशाची निळाई वरती
हरित दर्पणी रूप पाहता
डोंगर हिरवा निळ्याला भरती

हिरव्या हिरव्यागार मल्मली
शेल्याने डोंगरे झाकली
शृंगाराला उधाण आले
आभाळाने कात टाकली

धुक्यात वेड्या फिके जाहले
ऊन जरासे दबकत आले
डोंगर हिरवे मुकुट घालुनी
मोरपिसांनी सजून गेले

सजून धजून निळा श्याम होऊनी
स्वर्गाचे सूर ओठी घेऊनी
नभ कृष्णाई झुकता खाली
डोंगरराधा बहरूनी आली

दि. १३/७/१९
सकाळी ९.४७ वा.



## (४१)
**कत्तल माझी**

कत्तल करून माझी
बघा निजवून ठेवलंय
फुलाफुलांनी मग
मला सजवून ठेवलंय

असली कसली ही फॅशन
खोडा अखंड कापलंय
चकत्या करून त्यावर
फुलाबाळांना थोपलंय

फुलं ताजी ताजी
टोपलीत बसून
झाडाचं दुःख
पाहतात वाकून

त्यांना रडता येईना
पळता येईना
खंत मनातून
जाता जाईना

ही माणसं आपल्या
सुखासाठी काहीही करतात ना
मोठमोठाल्या झाडांना तोडून
फोटोत वृक्षारोपण करतात ना

दि. ०९/०७/१९
स. ०६:१५



## (४२)
## आभायानं उघडून दार

झुंजूमुंजू झालं
पाखरानं गाणं गाईल
आभायानं उघडून दार
पृथ्वीकडं पाहिलं

आलो अगं घेऊन खऱ्या
रंगांच्या मी छटा
उठ गं सखे जागवाया
मधुर सुरावटा

येईल बघ अरुण रथी
घेऊन सुर्व्याला
लाल केशरी रंगांचा
इथं गलबला

हळू हळू सोनकिरणं
अंगावर तुझ्या
उठली माझी सृष्टिराणी
जागवतोय राजा

पहाटेला रंग थवा
पसरला जवा
मोरपिशी आभाळात
कृष्ण घननिळा

धरा होई राधा आणिक
रास क्षितिजाला
कोडं गोड उलगडं
सृष्टीभर लीला

दि. ०९/०७/१९
स. ०६:०५



## (४३)
## झरे धबधबे

डोंगरावर भरलीया
झाडाझुडुपांची जत्रा
झरे धबधबे वाहतायत
सातशे सतरा

गवताच्या पात्या
होऊन दंग
झग्याचा दावत्यात
पोपटी रंग

वर धुक्यानं केली
एकंच दाटी
ऊन साहिलंय एका
ह्या क्षणासाठी

झाडांनी घातलीया
दवांची माळ
खाली शेतात चालतोय
नांगराचा फाळ

ढगांनी धुतला
डोंगर सारा
पाचूचं धोतर
नेसवलं जरा

डोंगरमाथ्याला
धुक्याचा फेटा
राऽऽऽजबिंड्या
डोंगराला भेटा

मन बी हिरवं
तन बी हिरवं
डोळ्यातलं सपान
झालंया बरवं

दि. ९/७/१९
पहाटे ५.५० वा.



## (४४)
## ओझे दवाचे

ओझे दवाचे झाले
नाजुकशा पानुलीला
परी हार टपोर मोत्यांचा
तिने घातला की गळ्याला

तिचा रंग लालसर कवळा
पानुली स्वभावही हळवा
दव भिजल्या अंगावरती
हिमस्पर्शी ओघळ बावळा

थेंबात दवाच्या दिसते
पानांचे ते प्रतिबिंब
प्रतिमाही पानापेक्षा
अधिकच जराशी चिंब

पान कत्र कत्र नक्षीचे
टोक तीक्ष्ण सरळ सूचीचे
दव मुलायम पांघरता
पान मृदुल हो स्पर्शाचे

ही सकाळ पाऊसवेडी
मज तिचीच आहे गोडी
तन मन भिजून ओले
सुकलेपण कधीच सोडी

दवबिंदूंचे क्षण होता
आठवता पाऊस येई
मजवरी सुखाने बरसत
अवचित भिजवून जाई

दि. १४/७/१९
सायं. ७.०३ वा.



## (४५)
## गंध अत्तरे

फुलं भरल्या करंड्या, सजल्या दारी
लेवून गंधाची अत्तरे
दरवळ जाता चोहीकडे, मी लपवू कसे
जर गंधच देतो उत्तरे

घरात ठरला शुभ सोहळा
लगबग झाली सगळीकडे
करंडीत आनंदही भरला
हसून फुलांनी फेर ही धरला

नवरीसाठी गजरे झाले
चेहरे सगळे हसरे झाले
सुवासिनीही धावत आल्या
वरमाला वधूमाला सजल्या

मंगलाष्टके मंत्रोच्चार
विवाहविधीचे सोपस्कार
मनात फुलता गजरा आता
नको अन्य काही उपचार

देवधर्म पूजा संस्कार
देव गळ्यातील मोगरहार
मृदु फुलांचा साज शृंगार
गंधमोगरी धूपाचार

आज दिवस संपेल असा
नवजीवन आशा ही निशा
मंचक सारा मोगरामय
ती माझी नि मीही तिचा

संसाराची बहरेल वेल
मनात बंदी मोगरवेळ
गंध तिचा की, गंध फुलांचा
सारा माझा अंतरखेळ

भरभरून मी जगता क्षण
गंधित वेळा गंधित मन
एक मोगरा किती सांगतो
वेचून घेतो मी पटकन

एक कुपी हृदयात माझ्या
अंतरी बसली, गंध मोगरा
निवांत बसता दरवळ देते
पट दाखवते सगळा सगळा

दि. १८/०७/१९
दु. ०१:३० वा.



## (४६)
## गवत कसे मोहरून जाते

गवताचीही सुगी येते
वैभव त्याचे पसरून जाते
हिरव्या रंगात नाहून माखून
गवत कसे मोहरून जाते

डोळ्याला केवढे छान वाटते
मनातही हिरवळ दाट दाटते
फिटले जसे पांग जणू
ओसाड माळरान प्रसन्न भासते

मंद झुळुक येते कुठूनशी
इवले इवले गवत डुलती
पात्या त्याच्या मऊशार
येताच यौवन बोथट धार

तेच सुकले की टोचत राहील
उगाच कितीवेळ बोचत राहील
नकोसे वाटेल फिरकणे
क्षणांनीही सरकणे

म्हणून गवतास जिवंत ठेव
हरित ताजे तवाने ठेव
सुकू देऊ नको, बोचू देऊ नको
जमीन बंजर होऊ देऊ नको

हळूच गवतफुल उमलून येईल
छोट्याशा झुळकेत डुलून घेईल
फुलपाखरं येतील मग
गवत डवरून जाईल मग

दि. १७/७/१९
रात्री ११.३४ वा.



## (४७)
## रानकेळी

अशी डोंगऽऽराची राणी
तिची कूस उजवली बाई
प्रेमवर्षावानं गाभा
रानकेळी की फुलली

येता ऋतु पावसाळी
तिच्या चेहऱ्या झळाळी
पोटी तरारून आल्या
गर्भी उलुश्या गं केळी

जीव नाजूक उलुसा
डोंगरराणीला दिलासा
बाळकेळी वाढताना
देती आईला भरोसा

नको होऊ दुःखी कधी
गोड जीवनाला करू
रानकेळी सोनसळी
खातांना गं सुख देऊ

तुझी लेकरं अशी गं
काम तुझ्यावाणी करू
देत पोषण जगाया
आम्ही कीर्तिमान ठरू

दि. १९/७/१९
सकाळी ७.०९ वा.



## (४८)
## खडक विराण

खडक विराण हे बसले सुकले
वर्षाराणीच्या वाटेस डोळे
ती येईल ना उमलून उमडुन
बरसून जाईल क्षण चांगले

अंगावरती तिच्यामुळे जी
चैतन्याची ये हिरवाई
ती जाता मग देऊन जाते
विरहाची सोबत सांगाती

तिच्या स्मृतींनी तन सुकते हे
तन ना केवळ मनही सुकते
झोप न लागे निधड्या पहाडा
मनात मलमल प्रीत उमलते

वरवर कठोर किती भासतो
डोंगर वेडा उगाच हसतो
तिच्यासंगती क्षण रंगती
मनात मीलन गुंफत बसतो

ती आली की टिपटीप थेंबा
अंगावरती सांडून जाईल
मला विसरला म्हणून वेडी
लाडिक थोडे भांडून जाईल

तीही चिंब नि चिंब होई मी
भिजले क्षण ते ओलावताना
थोडे मीलन जरी आमुचे
होत धबधबे कोसळताना

आत जपतो मी प्रीतफुलाला
पाषाणाच्या आत ओलावा
तिचे नि माझे व्हावे मीलन
ऋतू सांडता स्पर्श बोलावा

दि. २६/१२/२०२०
सकाळी १०.२३ वा.



## (४९)
## कवडसा

घरे बंद ही छतेही बंद
सिमेंटची पक्की पाबंद
जरा इवलुसा असा झरोका
नाही येईल कुठून कवडसा

ते छत होते मैत्रीपूर्ण
काट्याकुट्यांचे लाकडी जीर्ण
तरी त्यातुनी रोज सकाळी
डोकवून जातसंत ती किरणं

अशा प्रकाशा दोरीसंगे
लटकून गेले रम्य बालपण
धुळीकणांना पकडत होतो
लहान मोठे सारे आपण

अंधाराच्या छाताडावर
नाचून जाई रोज कवडसा
त्याच्या येण्यासवे आशेचा
एक किरणंही सापडलेला

खेळ चालले भू सूर्याचे
तो येई फट छोटी सांधून
घर साधे अन मनही मोकळे
गेले आता मनही बांधून

आता न येतो सूर्य अंगणी
घरात त्याला प्रवेश नाही
नाही किरणे तेजंही नाही
कुठे कवडसे गेले पाही

चला घरांना आणि छतांना
ठेऊ मोकळे थोड्या सांदी
मनास करूया पुन्हा खुले अन
लुटून घ्यावी कवडसी चांदणी

पुन्हा मोजूया कण धुळीचे
मनास करूया स्वच्छ चांगले
पुन्हा जगाया सोडू मोकळे
पहा कवडशा झुले बांधले

दि. १९/०४/२१
दुपारी १२.४५ वा.



## (५०)
## एक झाड आयुष्याचं

रान गुलाबी जांभळं
गुलबक्षी तुऱ्यांचं
एक झाड उभं वाकडं
तरी ऐटीत तोऱ्यात

आला पल्याड डोंगराच्या
तेज घेऊन हा सूर्य
रान गुलाबी पाहून
दिंमूढ झाला सूर्य

देतो पसरून त्यावर
किरणं सोनरी सोनेरी
गुलबक्षी रंग लाजे
येते अंगावर शिरशिरी

सोनसकाळी चालतो
खेळ खट्याळ दोघांचा
रानराणीच्या रंगावर
भुलूनिया रविराजा

अशी सकाळ पहावी
दुरदुरुनी कोठुनी
मनी गुलाबी रंगाच्या
पडू द्यावे उन्हं सोनी

मग खुलून येईल
जीवनाची प्रभात ही
एक झाड आयुष्याचं
कसं दिसं देखणंही

दि. १७/०४/२१
०९.०३ वा.



## (५१)
## पिंपळ पानी मन उतरावे

एका पिंपळपानाचे
रंग किती अलवार
जणू कोवलाई ही झाली
अलगद त्यावर स्वार

रंग केशरी पिवळे पोपटी
काही वाढती काही धाकुटी
काही लाल तांबडे रांगडे
काही बदामी काही लांबडे

हिरवट पिवळे सोनकोवळे
काही गुलाबी अतरंगी
नक्षी सारखी कोरून झाली
तीही भासते सतरंगी

देठ कोवळे शेंडे नाजूक
वास नवा नवलाई साजूक
स्पर्श तलम रेशमी मल्मली
पिंपळपाने गर्दी केली

काय सांगती कवळी पाने
मनास ठेवा तलम कोवळे
नका जरठ त्या होऊ द्यावे
रंग मनाचे फुलतील सारे

पिंपळ पानी मन उतरावे
भाववर्ण ते खुलून यावे
आधाराचा तरुवर ज्ञानी
अतरंगांची शोभा मोहे

जरठ राठ मन होऊ न द्यावे
रंग त्यावरी मचकट सारे
अंतरंग जपताच कोवळे
मनात सारे जपता येते

दि. १८/०४/२१
रात्री १२.२१ वा.



## (५२)
## गर्द जांभळ्या फुलांवरी

धुंद धुंदले गुंग गुंगले
बुडून मधुप्राशनी
गर्द जांभळ्या फुलांवरी
फुलपाखरू रंगीत तनी

मनात खुलले चुंबून घेण्या
माधुरी फुलराण्यांची
अलगद बसले हळूच हसले
नयनी प्रीत मदनाची

गुलकंदी गुलराण्या साऱ्या
लाजून चूर की झाल्या
टकमक पाहती डोळे तयाचे
पराग सांडून गेल्या

मीलित नेत्री स्वप्न रंगले
रंगरंगील्या रसिकाचे
तेच सुरंगही उमटून गेले
वैभव सुंदर पंखांचे

प्राशुन मधुगंधाला झाले
मधाळ हे पाखरू
हवेत उडते व्हावे वाटते
मनास फुलपाखरू

दि. ११/०७/२०२०
सकाळी १०.२९ वा.



## (५३)
## सुव्र्या रामाच्या पारी

आमराईत येतो फिराया
सुव्र्या रामाच्या पारी बाई
त्याला मोहोर गंधून घायची
रोजरोजंच होतीया घाई

कल्पवृक्ष म्हणं सर्गात हाय त्यो
आंब्याची उणीव तरी बी
माणसाला मिळालं वरदान चाखाया
दिनकर तरसून ऱ्हाई जी

हितंच झाडाच्या पायाशी पसरून
तानून देतोय अंगाला
भराला येतोय उन्हाळी ऋतूत
मोहोर गंधाळा आंब्याला

त्या मोहराचा वास आता फळाचा ध्यास
रोज रोज सकाळी दिमतीला
कावती उषा पर मनात आशा
आंब्याचा सुवास संगतीला

आला आला आंबा आता लगडला
वारा मग मस्तीत झोंबायला
पाडाला पिकला सुवास सुटला
खुळ्या सुव्र्यानं सोनेरी रंग दिला

पिवळा धमक आंबा कशाला थांबा
लगेच उतरवा घाला आडी
पिकल्या फळाची रसाळी करा कुणी
कुणी अशाच जिभंवर ठेवा फोडी

दि. ११/०७/२०२०
सकाळी १०.५३ वा.



## (५४)
## गाव बुडालं

आला कुठून हा पूर
सारं पाणी पाणी झालं
गाव हुंदकं देऊन
खोल त्याच्यात बुडालं

गेलं गेलं सारं गेलं
क्षणामंदी जलमय
खरं धन या जिवाचं
माझं लेकरूच हाय

कवटाळून त्यालाच
कशी वाट हुडकावी
काही गावंना खरंच
भ्या हे आतून भेववी

हात आवळले त्यानं
माझ्या गळ्याच्या भवती
माय वाचवंल त्याला
त्याचा भरवसा किती

काळ पाण्याच्या रुपात
गिळण्याला पसरला
सारं पोटात घेऊन
अधाशी ह्यो कसा झाला

देवा करते मी धावा
जीव धोक्यात न जावा
माझ्या बाळाला तरी हो
परलयात वाचवा

दावा चमत्कार काही
वाट सापडू द्या आता
बाळ जगू दे यातून
जीव जावो मग माझा

दि. ०४/०८/२०२०
रात्री ०९.५८ वा.




## (५५)
## वाट गाभुळी गाभुळी

वाट गाभुळी गाभुळी
ओलसर सरी ल्याली
वर डोंगुर झाकोळा
धुक्यातून प्रीत आली

सरी सरसर त्याच्या
अंगावर पडत्यात
डोंगुराला गे शहारा
लाज सरीच्या व्हटात

आज ठरवलं तिनं
प्रेम सांगून टाकावं
धुकं ओढणी करावी
स्वतः झोकून टाकावं

प्रीत सरी बरसल्या
नग गोरामोरा झाला
काळा कातळ डोंगुर
तिला पांघरून गेला

पायथ्याशी पायवाट
रोज भेटायाची त्याला
त्योबी रोजचाच हाय
आज नव्या वाटे गेला

दि. १९/०८/२०२०
सायं. ६.२१ वा.




## (५६)
## गेली नभात नारळी

गेली नभात नारळी
स्वच्छ नितळ आकाश
भरते ना ढगांसवे
आत जलाने आभाळ

तरु इतरही सारे
जणू भरात की येती
गगनाच्या दर्पणात
निजबिंब ते पाहती

काही गुज लपविले
त्यांनी मनात कधीचे
सांगण्यास उतावीळ
प्रेम भुईचे भुईचे

घर कौलारू पाहते
साऱ्या ऋतूंची मिजास
आत जपून ठेवते
एक उबदार आस

अशी प्रसन्न सकाळ
घरीदारी पसरावी
क्षणी हुंगावा सुवास
चिंता सारी विसरावी

दि. २०/०८/२०२०
सकाळी ०८.३४ वा.




## (५७)
## आकाशाने खेळली होळी

अहा ! आज काय रंग पसरले
पाहून मी भान सारे विसरले
आकाशाने आज खेळली की होळी
रंगपंचमीची उधळण झाली

आज आकाशी निळ्या या रंगात रंगला
फिका केशरी गुलाबी रंग ढवळा विरला
सरोवर सुंदर ते देखणाची आरसा की
नभातून अप्सरांची इथे प्रतिबिंबा दाटी

नभ आधीच सुरेख त्यात वर्ण रमणीय
झाडे झुकली जराशी जणू कांता कमनीय
शांत निवांत जळात रूप निरंखत जावे
सुख अनन्य इथेच सारे साठवून घ्यावे

सारे सारेच सुरेख, कोण किती ते सरस
कसे सांगावे लावण्य, वितळलेले पारस
आरपार शिरले हे चित्र हृदयात माझ्या
अशी प्रेमात पडले बाबा चित्रकारा तुझ्या

असे रंग की भरावे कर्म कुंचल्याने सारे
जणू मोरपीस मनी अलगद फिरणारे
मीही अलवार राधा सारी बंधने तोडून
जीवलगी कृष्णसखा एक आत्म्याशी
जोडून

दि. १३/१०/२०२०
सायं. ७.२३ वा.



## (५८)
## हा चंद्र अमृताचा

पहाटे भल्या उगवला
हा चंद्र अमृताचा
कोजागिरीच्या साठी
निधी होत औषधींचा

जेथून जन्म त्याचा
त्या सागरास भेटे
एकांत शांतवेळी
सांगे मनातले ते

जी लक्ष्मीही निघाली
तव मंथनी कृपेने
मी आज तिजसवे हा
धरणीस सौख्य देणे

करती प्रतीक्षा सारे
हे वैद्यराज माझी
येताच पौर्णिमा ही
सिद्धीस औषधी की

रात्रीस मेळे भरती
गप्पा नि गोष्टी रंगी
तेव्हा कुठे उसंत
भेटेल मजसी संगी

म्हटले उठून यावे
हे सागरा पहाटे
तू जन्मदाता आमुचा
भरती तुलाही येते

अश्विन हा मास ऐसा
ऋतू शारदीय शीतल
खुश मी अशात खूपच
सागर, गगन नि भूतल

देईन आज सारे
माझे म्हणून जे जे
शीतल चांदणे अन्
अमृत पाझरावे

कोणी युगुल प्रेमी
माझ्याच आज साक्षी
जीवास गुंतताना
डोळ्यात चांदपक्षी

साऱ्या वनस्पतीही
होतील पुष्ट आज
संवत्सराने एका
हे दान मिळते त्यांस

मी भेटतो तुला रे
रश्मींच्या या करांनी
भरते उरात तुझिया
हे बिंब साठवांनी

येते उधाण तुजला
पहाटेस अमृताचे
कोजागिरी करू या
नाते युगायुगांचे

दि. ३०/१०/२०२०
सकाळी ९.५३ वा.



उंच इमारत माझी
कौतुक प्रगतीचे
फिके पडते परंतु
निसर्गाच्या किमये पुढे ते

तेज फाकते फाकते
इमारत खुजी भासे
स्पर्श करण्या आकाशा
जणू चढली उंच असे

सामावून घेऊ त्याच्या
दिप्तीमंत तेजश्रीला
उठू पहाटे पहाटे
मिळवू आरोग्याच्या श्रीला

त्याच्या अगम्य चालती
लीला अनंत आकाशी
चित्त भरून टाकावे
ऐशी कांत तेजोराशी

दि. २३/११/२०२०
सकाळी ०७.३५ वा.

## (५९)
## ढगांचा गालिचा

ढगाढगांचा गालिचा,
नभांगणात अंथरला
बघा सकाळी सकाळी
सूर्यनारायण अवतरला



## (६०)
## शुभरंगांनो

उगवतीच्या शुभरंगांनो
उगवून या ना मज आकाशी
आणिक आणा सूर्य मागुनी
तेजाळलेला चित्तनभाशी

एक सुवर्णासम कांतीने
अंतःकरणी घ्यावा ठाव
चित्तसूर्य उदयाचली यावा
आत्मसविता त्याचे नाव

हळूहळू तो प्राचीवरती
रक्तरक्तिमा घेऊन येवो
मागे मागे उजळून दिग्बल
क्षितिजासम मन नवेच होवो

सप्तरंग मग आयुष्याचे
या सूर्याने उधळून द्यावे
मज ह्रदयाच्या नभांगणावर
इंद्रधनू ते उमटून यावे

रोज पहाटे पहाट गावी
सप्तसुरांचे सूर नव्याने
मंजुळ वेणू उमटून जावी
गोकुळगावी पुन्हा नव्याने

दि. २१/११/२०२०
०७.३९ वा.



## (६१)
## नभ घुसळून जाय

वारा घोंगावतो आहे
नभ घुसळून जाय
सागराची ही निळाई
गगनात पात्र होय

शुभ्र तक्रासम मऊ
रंग वर फेसाळतो
गोळा नवनीताचा हा
जणू सोनेरी फळतो

सूर्यनारायण आला
आला तेजाळ मधाळ
रस रूप गंध त्याचा
पांघरते ही सकाळ

त्याचे बिंब वर वर
जसजसे सरकते
नवनवीन विचार
जगण्यास सांगताते

रोज रोजचे मंथन
दोर मायेच्या की हाती
रंग रोजचे नवीन
चित्रकार हा प्रवीण

दि. २४/११/२०२०
सकाळी ०८.२१ वा.



## (६२)
## केशराचे झाड

रम्य ही सकाळ,
शांतीचा सुकाळ
केशराचे झाड उभे,
वसंतास बळ

झाडाईच्या रांगेमध्ये,
सरलता छान
हिरव्या हिरव्या गवतावर,
खुलते की पान

गळलेली पानं वेडी,
वाट पाहताती
पुन्हा झाडावरी जाऊ,
की जाऊ कुणा हाती

निळ्याशार गगनात
केशराचे बिंब
केशरिया पानांनी
हा वृक्ष रंगचिंब

पिवळया पिवळ्या पानांचा
हा डवरून आला
अन्य एक वृक्ष रंगी
भाळूनिया गेला

अशी ही सकाळ सांगा
अंगणात आली
रुणझुण पैंजणाने
रेंगाळून गेली

दि. २७/११/२०२०
सकाळी १०.३० वा.




## (६३)
## वाट लाजली

वाट लाजली लाजली
कशी गोरीमोरी झाली
आज राजसाने तिला
पहाटेच चुंबीयेली

सोन शालू दिला तिला
तिचे लावण्य खुलले
रान गुपचूप वेडे
डोळे मिटून बसले

झाडं वेलींच्या आडून
प्रीतवल्ली त्यांची चाले
कसा वाकून झोकून
प्रियतमेला न्याहाळे

तो तो लपवते तीही
अंग चोरून लावण्या
त्याचे किरणांचे कर
तिच्या भोवती विळखा

कशी शहारली बघा
वाट नागमोडी झाली
सळसळ की पानांची
कानी हळुवार आली

सावरते ती अंचल
प्रियतम तो चंचल
त्याच्या रंगात बुडून
क्षणी तीही अविचल

दिसभर हेच चाले
साऱ्या दिशांनी तो पाही
तिजवरती प्रेमाचा
तेजवर्षाव तो करी

येता सांज मावळती
दोघे काळवंडलेले
विरहाचे क्षण नको
रोज निशेसी भांडलेले

जातो कर्तव्य वहाण्या
वाटेकडे त्याचे डोळे
वाट पाहते वाटंही
विरहाचे घोट काळे

होता पहाट सोनेरी
रंग तिचा उजळतो
प्रियतम सखा सूर्य
तेज कोवळे आणतो

झाडे आनंदात सारी
गीत मीलनाचे गाती
पालवीची सळसळ
पक्षी सप्तसुर देती

दिस घालवतो तोही
वाट त्यालाच सांभाळी
किरणांनी लाजलेली
गोड वाट ही सकाळी
रोज दिसते सकाळी

दि. ०७/१२/२०२०
सकाळी ९.२७ वा.



## (६४)
## कापसाचे बिस्तर

खाली सुंदर प्रस्तर
वर आकाश दुस्तर
मेघ हलकेफुलके
कापसाचे ते बिस्तर

आकाशी हा निळा रंग
डोकावतो ढगातून
खडकांच्या हृदयात
स्रोत पाझरे आतून

वरवर ते भकास
वाटताती ते उदास
आत जपलेला त्यांनी
किती युगे इतिहास

शांत अबोल हे सारे
मार्ग एकला निवांत
कधी एकट्याने जावे
मन करावे प्रशांत

गुज धरतीचे ठावे
अनंतशा आकाशाला
आकाशाची घुसमट
घालमेल जाणे धरा

दोघे एकमेकांसाठी
होत आरसा देखणे
बिंब न्याहाळता दोघे
एकरूप एक होणे

वरवरती सुखावे कोणी
चित्र ते पाहून
आत खाचखळगे की
अंतरंग निरखून

असे डोकवावे आत
मन आकाश उकले
धरा आत्मरूप होय
जगणेच रम्य झाले

दि. ०४/१२/२०२०
सकाळी ०८.५४ वा.




## (६५)
## आज सांज म्हणे वेडी

आज सांज म्हणे वेडी
गोड थंडीत बुडाली
थंडी गुलाबी की बंडी
तिने अंगी पांघरली

बंडखोर थोडी थोडी
अवखळ वेडी लाडी
वेड तिज ऐसे लागे
लागे ऋतूची या गोडी

गोडीगुलाबीने ऐशी
गुलाबात हास
हसली की राधा
श्याम गुलाबीच रास

रास रंगांची उधळे
संध्याराणी गगनात
गगन मगन त्यात होई
रंग त्याच्याही मनात

मनी असती जे रंग
आत खोल दडलेले
दडूनिया प्रेम सारे
सारे आत वाढलेले

रंग पसरला आता
मला सांगणे की सोपे
प्रियेदारी निशिगंध
मन गुलाबाच्या संगे

रात्र तरुणी सुंदरी
जरा सजुनिया आली
वाट पाहण्या आधीच
माझी वाट गंधाळली

रंग असेच राहू दे
थोडे वेडे ते अल्लड
आज स्वर्गीचा वसंत
इथे मला ना उसंत

मन चिंब गुलाबाने
आत रुधिर गुलाबी
प्रिया गुलाबी नि तिची
रिझवणंही गुलाबी

दि. ०४/१२/२०२०
रात्री ०९.०१ वा.




## (६६)
## सांज गुलाबी

निळ्या जांभळ्या क्षितिजाशी
सांज गुलाबी टेकली
नभ राणी सागराला
पाहण्यास की वाकली

तिचा शालू भरजरी
जर चांदण्यांची खडी
पदरास जांभळाई
बिंब सागर हृदयी

त्याचे मनंही गुलाबी
लाटा उसळून येती
प्रेम तरंग नव्याने
त्याची उतावीळ भरती

आज लाडात आलेली
किती रंग ती ल्यालेली
एक रंग उसळतो
सुधा न्यारी की प्यालेली

अशा सांजमीलनाला
चंद्र साक्ष देत राही
लाज गुलाबी वाढवी
तो की प्रेमदूत होई

मावळतीच्या सूर्याने
मंद प्रकाश केला हा
अशा लाघवी प्रीतीच्या
किती वेल्हाळ वेळा ह्या

सय दिसभर तिची
नभांगना कामामध्ये
जरा फुरसत आली
रत्नाकर जोमामध्ये

तिचे नितळ ते बिंब
याच्या अंगाखांद्यावर
दोघे भेटले मिठीत
कसनुस बांधावर

क्षितीजाच्या मनी फुले
मीलनाची गोड बात
डोळे मिटून घेताच
नभसागर भरात

दि. ०८/१२/२०२०
सायं. ०७.११ वा.



## (६७)
## एक वळण सुरेख

एक वळण सुरेख
झाडी घनदाट देख
नाही कल्लोळ उगाच
शांती निरव बरीच

मूळ लाल माती येथे
मार्ग बांधियेला पक्का
वाट घाटातली बघा
जरा विसावली आता

किती येतात जातात
वाटसरू रोज इथं
हिच्या सौंदर्याचे नित्य
किती करती पारख

धावणाऱ्या जगण्याला
जरा थांबवावे कधी
अशा वळणवाटेला
जीव रमवावा कधी

थोडे पहावे बाहेर
आत डोकवावे मग
जे की दिसते बाहेर
तेच अंतरात बघ

दि. ०९/१२/२०२०
सकाळी ०९.२१ वा.




## (६८)
## मन कमळ

मन कमळ फुलून यावं असं
चित्त सरोवरही नितळसं
शुभ्र स्वच्छ जलाची सुंदरता
शुभ्रदल पंकजे उमलता

नानाविध भावनांची कल्लोळता
शांत कराव्या संयमी लाटा अशा
मग पहावे सूर्यास निरखुनी
अंतःकरण घ्यावे की पारखुनी

आजूबाजूस किती ही हिरवाई
मनी उगाच दुःखाची दुखराई
त्यास चिखल करून तुडविता
वर आनंदकंदाची कमळाई

वाट पाहती कित्येक कळ्या अशा
कधी फुलण्या मिळेल वाव खरा
चित्त लावावे नारायणाच्या पायी
मग विकास साराच देख जरा

लिप्त नकोच संसारजल तनी
राहू त्यातच नको ते तरी मनी
पायी दलदल असू दे कितीतरी
वर मुखकमलाची शोभा भारी

असे उमलून येता आत कमळ
वर कांती झळके ना सकळ
सरोवराच्या विरुद्ध आपुले
चिखल वर तरी आत फुलणे

वरच्या लाटा वरचे पाणी
सारे चिखलही वर फेकणी
आत उमले कमलदल
चित्तसूर्याची अशी करणी

दि. ११/१२/२०२०
सकाळी ०९.४९ वा.



## (६९)
## स्वप्नामध्ये गढली निशा

पहाट फुटली अंधाराला
खबर न त्याची झाली
स्वप्नामध्ये गढली निशा मग
उषेस झेलून गेली

दिले आळोखे किती पिळोखे
पडदे डोळ्यावरती
रातराणीचे स्वप्नं चालले
प्रणय तिला तिज स्मरती

परी पहाटे किरणे लेऊन
ताजी कोमल हळवी
सूर्य करी मग पाठलाग हा
उषा सोनेरी हळदी

चंद्र निशेच्या कुशीत दडला
उषा उगवली हलके
मागे मागे अवखळ राजस
किरण नयन बोलके

अंधाराचा घेत फायदा
लपून जाते उषा
पसरवीत हे तेज प्रेमाचे
उजळून टाकी दिशा

एक मावळे एक उगवते
आकाशी तनुवरती
प्रेम विलासा पाहता खळीही
खुलते गालावरती

निसर्ग करतो प्रेम तेवढेच
कमी न कधीही होते
माणूस उबगून जातो परी हा
प्रीत इतिश्री होते

रोज तेवढेच रंग पसरणे
प्रेयसीसवे विश्व विसरणे
या प्रेमाला कमीच नाही
रोज तेवढे बहरून येणे

वाट पाहते एक सांजेची
एक पहाटे उमलून येते
प्रेम नशिबी दोघींच्याही
दिवारातीला फळून येते

दि. १३/१२/२०२०
सकाळी ०८.१९ वा.



## (७०)
## सुंदर स्वर्ग इथेच देख तो

कशास आणखी हवा कोणता
स्वर्ग कुठे तो कधी भेटतो
त्यासाठी अन देह सोडुनी
अनामिक स्थळी कुणी खेटतो

सुंदर स्वर्ग इथेच देख तो
निसर्ग हिरवा आणिक बरवा
हा इवलुसा प्रवाह वाहत
घेऊन येतो शीत गारवा

दगडा दगडांच्या या घळी अन्
डोकवे कवळे त्यात तृणांकुर
रंगबिरंगी फुलपाखरे
शोषून घेती रस ही सुंदर

निळ्या निळ्या पाण्यात बुडवुनी
या पायांना सोडून खाली
क्षणात विसरून जावे सारे
थकवा दुःख नि रिक्त पखाली

झाडेवेली गुपचूप गुपचूप
गूज सांगती शांत सकाळी
आणिक भेटून घेते येथेच
कुणी प्रेयसी सायंकाळी

मनात सारे साठवून हे
पुन्हा जगाया बळ केवढे
रखरखत्या या जगण्यासाठी
हिरवे औषध पुरे एवढे

दि. १२/१२/२०२०
रात्री १०.५३ वा.




**(७१)**

**बहर केवढा अजोड**

फुलाफुलांच्या या बगीच्याला
नयनांतून साठवू
जीवनातले क्षण फुलांसम
नित्य नवे आठवू

फुलण्याआधी वेळ लागतो
झाडाला बहरण्या
पाने शाखा कळ्या खेळवून
मग सुमन उमलण्या

अजून नसते साधे सारे
ऋतू अजब पेलणे
उनाड वारा, ऊन पोळते
रागीट सरी झेलणे

तरी पुरून त्या साऱ्या उरवीत
झुडूप ताजेतवाने
कधी टाकती थकून सुकून
माना पिवळी पाने

दुःख तयांचे नसते का त्या
कोण विचारी त्याला
स्वतःच मात्रा शोधून पाही
पुन्हा हरित स्वप्नाला

उमलून आले फूल डोलते
किती क्षणांचा मोद
वारा येई येती पाखरे
रसिक घेण्यामोद

नसेल जेव्हा बहर आलेला
कुणीच फिरकत नाही
झाड बोडखे खाई तडाखे
मनास हरकत नाही

सुकती बागा माहीत त्याला
तरी पुन्हा फुलवितो
अंगावरती कळ्याफुलांना
आनंदे झुलवितो

जगून घेतो फुलाफुलांचा
मौसम वेडा गोड
दुःख सोसणे नित्याचे पण
बहर केवढा अजोड

दि. १८/१२/२०२०
सकाळी ७.२१ वा.




## (७२)
## ब्रह्मांडाची उत्पत्ती

वारा पाणी बर्फा घोळविती
बर्फान्डे आकारा
सृष्टीमधली सृष्टी विरळ ही
क्वचित ये साकारा

दुर्मिळ काही दृश्य दिसती या
ब्रह्मांडी अवचित
दृष्टी सौंदर्याची हवी बघ
असते रसिका खचित

एका अवनीवरती कोठे
ऊन अति तापते
कुठे बरसतो पाऊस वेडा
कणतनमन कापते

कुठे थंडीची अतिरेकाई
पाषाने गोठती
पाणीपाणी व्हावे वाटले
बर्फ वितळू पाहती

पण हा वारा धरूनी गारा
पाण्यासवे खेळतो
बर्फा अंगी घेऊन पाण्या
वरी असा लोळतो

गोलगोल तो फिरतो विरतो
मीलन होता दोन्ही
त्या दोघांच्या क्रीडेमधले
अंड जन्मते काही

जलराणी त्या वाऱ्यासंगे
एकरूप अशी होते
नव्या रूपाला त्या स्वरूपाला
उदरामध्ये घेते

प्रेम जसजसे बहरून येते
अंडे नवजन्माचे
रूप वेगळे दिव्य सोहळे
कोडे आकाराचे

अंडामधुनी ब्रह्मांडाची
उत्पत्ती होतसे
अन ब्रह्मांडी जीवन अंडी
चक्र असे दिसतसे

दि. १८/१२/२०२०
सकाळी ८.५७ वा.



## (७३)
## मी रानवाट

मी रानवाट ही गावठी
तू गावशील का रं मला
सिंगार काट्या अन कुट्याचा
पावशील का रं मला

हे रान माझ्या संगती
त्याच्याच साठी धावतो
ह्यो ह्यो किसान बी रोजचा
तुडवंत मला की चालतो

म्या बी कधी ना कोपले
त्यो पोसतो समद्या जगा
कोण बी ना वाली त्याला
रागवू म्या का उगा

त्याच्या शेतातलं सारं
तन माझ्या अंगावर
काट्याकुट्यांची झुडुपं
विसावती काठावर

म्या अशी नटूनथटून
वाट पाहते रं तुझी
ये सकाळी सावकाश
सांजच्याला बी कधी

दिसभरी तू कामामंदी
गढून जातोयास की
समद्याला देतोस तेज
ऊब बी पिरतीची ही

थांब थोडा एकटी मी
एकटीने ऱ्हाईली
जो कुणी आला तो गेला
टाकुनी पुढं पाऊली

ना कुणी थांबून पाही
काय मनी माझ्या हितं
सुर्व्या राजा सांगू कसं म्या
नाठाळलेली गोड गुपितं

प्रीत तुझी माझ्याशी जोडी
रेंगाळतो तू माझ्या साठी
म्या उरी खुलतीया येडी
किरणांची त्या मजला गोडी

रागावून तू भर दुपारी
लालसर होतो किती
मग जरा म्या सांगते ना
सांजच्याला ये माघारी

राग त्यो लई भारी बाबा
म्या कसं घेऊ कुशीत
शांत हो तू सांजला अन्
पहाटंला बी ये खुशीत

झाडं मिचमिचं डोळं करूनी
बघत्याती गुपचूप जरा
अन तरारून येती गवतं
अंगावर माझ्या शहारा

सोन्या सुर्व्या तू गुणाचा
हाय ना माझा धनी
वाट ही वाटंला डोळं
तूच तू माझ्या मनी
तूच तू माझ्या मनी

दि. २४/१२/२०२०
सकाळी १०.२१ वा.



## (७४)
## दोन क्षितिजे

दोन क्षितिजे आत बाहेरी
उगवे सूर्याचे बिंब करारी
कोवळे कोवळे किरण येती
मळभ घेऊन जाण्यास दूरी

प्राचीचा सूर्य रोज पाहतो
मनात वाकून काही बोलतो
आतला आत्मसूर्य एकला
आतल्या आत दिशा चालतो

बाहेर सांजा होतात रम्य
आतल्या सांजा करू सुरम्य
दिक्सूर्य तापतो निवतो आणि
चित्सूर्य सदाची आत्मगगनी

मावळतीचा सूर्य थकला
आकाश संचारूनी वाकला
क्षितिजाशी थोडे टेकतो कसा
तशातच भरा येते ही निशा

ग्लानीत सूर्य, चंद्र भरात
चांदण्या भरली नभपरात
रोज रातीला त्यांचा गोंधळ
रोहिणी सवे हा चंद्र मधाळ

मनात सूर्य क्षितिजा आड
चंद्र वाढला बिंब अल्लड
त्याच्या कला कला तेजसकला
चांदण्या अगणित ऐशा उनाड

पुन्हा येतो रोज उगवे रवी
आत बाहेरी चैतन्ये नवी
ठरलेली वेळ प्रभाकरची
आतला उगवे काही न ठावी

आतले क्षितिज विस्तारले की
उगवून पाही नवेच काही
सत्य शिव सुंदराचा तो सूर्य
चंद्र नि किती तारे डोहाळी

तेज आतून पसरू द्यावे
क्षितिजाने मग चिंब भिजावे
कधी या सूर्या कधी चंद्रासी
कवेत आपुल्या भरून घ्यावे

दि. १९/१२/२०२०
सकाळी ०८.१३ वा.



## (७५)
## मार्ग हिमगिरीपाशी

हा मार्ग चालला हिमगिरीपाशी
शीतलतेच्या अमाप राशी
अंगावरती ओढून चादर
रंग चांदणी बर्फ कणांशी

डोळ्यावरती पसरून जाते
छबी दिव्य त्या हिमालयाची
अन पायाशी लोळण घेती
पावन ऐशी तपोवनेची

गवत तृणांच्या पायघड्या या
पसरून देतो निसर्गराजा
वेद ध्वनी जणू गुंजन करती
खग सारे मधु सूक्ते गाता

झाडे सुरुची सदैव हसरी
वनस्पती अन दिव्य औषधी
गंगोत्री कैलास शिवाचे
ऋषी मुनी संतांची भूमी

उगा कधी इथे भ्रमण करावे
स्वर्ग भासतो धरणीवरचा
सुखे विसावत रूप खुलून ये
तीही निवांत इथेच रमता

उन्हे दुपारी बर्फावरती
चमकून त्याला पघळून देती
आणि निशेला युवा चंद्रमा
हुडहुडी देती किरणे त्याची

दृष्टीपथावर दूरदूर हिम
हिरव्या झाडांनी पांघरला
चंदेरी ओढून दुशाली
धरा सुंदरी ऋतू गांगरला

इथे अपर्णा उमा हैमवती
शंकरास तपे मिळवून गेली
देवांनी त्या सतीशिवाची
मीलनगाथा सुफळ केली

इथे पसरतो गंध तपाचा
पार्वती आणि तपोधनांच्या
टाकू काही आपुल्या समिधा
त्याग संयम नि शुद्ध मनांच्या

दि. २३/१२/२०२०
दुपारी ०१.१५ वा.



## (७६)
## ऋतू भुईवर

असा सांडला ऋतू भुईवर
लाली गाली धरा सैरभर
शालू प्रेमाचा पांघरला
फुले माळली अशी अंगभर

नाजूक साजूक मृदु पाकळ्या
लाजवीत त्या तिजसी सगळ्या
स्पर्श प्रियाचे होऊन गेल्या
मनात फुलल्या लाघववेळा

प्रीत गुलाबी उधाणलेली
अंगडाईतून विसावलेली
झाडझाडातून उमटली
वसुंधरा ही रती जाहली

मदनमंजिरी वेळीअवेळी
ऋतुविनाही बहरा आली
प्रेमपरिमळे सुमने फुलता
मने युगुलांची भरास आली

दाट गडद हा रंग गुलाबी
सर्वांगावर उमलत जाई
आणि धरणीच्या कुशीत प्रियवर
वसंत वेडा फुलून जाई

दि. २६/१२/२०२०
सकाळी ०९.५१ वा.



## (७७)
## वाटेवर भाळलेला

वाटेवर भाळलेला रविराज पहा
किरणांना मध्यम तो तळपवी तेव्हा

कांचनाची उधळण कांचनाच्या दिशा
वाटेवर सडा पडे सुवर्णकणांचा

मंद झाला धुंद झाला दिनकर येथे
गवताच्या पात्या सुद्धा सोनाळल्या तेथे

प्रियतम रंगामध्ये रंगली ही वाट
किरणांचा राजा करी नानाविध थाट

हळुवार अलवार प्रीतीचा प्रकाश
भावनांची उकलन वाटेवर खास

याच वाटेसाठी वाट चुकवीत येतो
तिला सवे दूरदूर घेऊनिया जातो

तिच्या मनी त्याचे रंग, गंधही त्याचेच
आत साठलेली रती मदनासाठीच

असा शांत मित्र जणू रोज वाटतो ना
तिच्या मनी स्वप्नं होत नित्य भेटतो ना

दि. ३०/१२/२०२०
सकाळी ०८.४० वा.



## (७८)
## वाट ही अबोल

हिरव्या हिरव्या झाडीतली
वाट ही अबोल
शांत निरव पहुडली
मनी काही खोल

हिरव्या पात्या झाडावरी
पल्लवांची माया
वाट नितळ रंग गोरा
मृदु तिची काया

कोण पांथ वाटसरू
आला त्या दिसाला
वाटेवर दुःख विरे
असा विसावला

गुज त्याचे गुंजते हे
अजून कानात
वाट हरपली तेव्हा
त्याच्याच मनात

विसरली परतून
यायचे तिला ते
काही तरी त्याला म्हणे
होते सांगायचे

देह इथं अंथरला
दूरदूर वनी
मन तिचं गेलं त्याच्या
डोकावून मनी

दुःख त्याचं सुख करीन
वाटेला वाटलं
मी उदासी दूर करीन
सुख त्या भेटलं

क्षण थोडे दंगले ते
रंगले मधाळ
दोघे एकरूप होता
आभाळ ढगाळ

चिंब दोघे जगून गेले
क्षण मीलनाचे
आजही की वाट पहा
गीत गाई त्याचे

ती बुडाली त्याच क्षणी
डोळे तिचे तिथे
मन वेडे आधीच गेले
राजसाहे जिथे

आता जरी दिसते वाट
वाटेवर ती ना
राहिली ना एकटी ती
आधी होती जी ना

दि. ३१/१२/२०२०
सकाळी ०८.४३ वा.



## (७९)
## धुकाळलेली ही सकाळ

धुक्याच्या पडद्यामागे
लपवला रविराजाला
सारे सारे न्याहाळता
चलबिचल उषामनाला

रोज रोज पाहती त्याला
लोक किती नजर ती लागे
सुंदराचे रूप दिनकर
तेज त्याच्या मागे मागे

आज जरा वाढली थंडी
धुके गेले दाट पसरून
उषा म्हणे थांबा जवळी
कामं सारे तुम्ही विसरून

साखर झोपेची आज
लाभावी पहाट धुंद
नित्यक्रम आहे रोजची
आज वेगळाची गंध

नभ कसे धुके धुके
झाडं पांढुरकी फिकी
खग उडताना भ्रम
गेले कुठे आकाश की

धरतीला पहा आज या
तलम पडद्याच्या आतून
अंग ती चोरताहे
धुक्याच्या पांघरणातून

आपणंही थांबू थोडे
रेंगाळून जाय सकाळ
कुशीतसे घेऊन मजला
चाला आकाश ढगाळ

दि. ०५/०१/२०२१
सकाळी ०९.५१ वा.



## (८०)
## आलास का उन्हा तू

आलास का उन्हा तू
झाडीत टेकण्याला
मृदु रेशमी तृणांकुर
गालिचा चालण्याला

उजळून गेली हिरवी
हिरवाई सोनवेडी
पाहून दर्पणी तव
गालात लाज थोडी

तू आणलास शालू
पिवळा सुवर्णकांती
नेसून ये सामोरी
कमनीय कांता सृष्टी

या मखमली तृणांनी
पसरून ज्या दिल्या ना
त्या पायघड्या चाला
मग रम्य सोहळा ना

कर हाती घेत हलका
तू जा पुढे पुढे हा
रमणीय सृष्टी ललना
मार्ग चाले तुझ्यासवे हा

ही सप्तजन्म नाती
चालून सप्तपदी रे
रमली तुझ्यासवे ती
ही प्रेयसी तुझी रे

घेऊन ये तू रोज
नाविन्यपूर्ण उषा
स्वप्नेचि रोज उमलून
ओसंडू दे मंजूषा

दि. २५/०१/२१
सकाळी ०८.११ वा.



## (८१)
## वांगं काटेरी

वांगं काटेरी काटेरी काटेरी
गावरान चवीच्या वाटेरी

अंगणात आलं बहरून नवं
रंग जांभळाऽऽ देठ हिरवं
ताजंतवानं बिया टचटचीत
पाहताच वाटे कधी खावं

कुणी म्हणतं कृष्णाकाठची चव
कुणा जळगावी भरीत ठावं
कधी काळसर, निळं जांभळं
हिरवं पांढुरकं रूप पहावं

कधी काट्यांनी चव राखली
कधी भरिता गुळगुळली
भरलं वांगं ठेचा कुटावा
जवार बाजरी भाकरी खावा

कधी राठ वांगी पिवळी तोडा
तुरदाळीत गाळ शिजवा
मसाले टाकून तडका फोडणी
गरगटं नाव चविष्ट देणी

वांगी भात, मसालेभाताची चव
भोगीची भाजी वांग्याने नवं
फोडीची भाजी बटाटे जोडी
लग्नकार्याची खमंग गोडी

सुकं करा की करा रस्याचं
भरून करा की चटपट लोणचं
चातुर्मास करी पाळे उपवास
श्रीखंडेरायासी रोडगा भरीत

काय हवं अजून वांगं अन्नमय
पुराणातली वांगी पुराणी ठेव
वांगं न बांगं बिचारं सांगं
दिसतं त्याला मनीचं सोंगं

खाण्याला जीभ पाणीपाणी गं
चव त्याची जात नाही खमंग
सुवास दरवळे दूरदूर
प्रेमाला वांग्याच्या आलाय पूर

दि. २८/०१/२१
सकाळी ०८.०३ वा.



## (८२)
## मीलनाचे साक्षी दव

या दवांना काय सांगू
आठवांच्या ओंजळी
पानावरती थांबलेल्या
स्वप्नवेड्या बिंदुळी

एक एका थेंबासाठी
थांबतो ऋतू ओघळे
वेडी बिथरे पानुली ही
श्वास चालती मोकळे

लव तिच्या अंगावरी
ये तरारून मल्मली
स्पर्श होता राजसाचा
गौरी होते शामली

लाज वाहे रोमरोमी
मीलनाच्या शर्वरी
रंग हिरवा गे मनाचा
पसरे लाली वरवरी

हे गुलाबी गाल होती
कंप होतो अंगी या
वेळ थांबे बिंदू बिंदू
दव दवाच्या रंगी या

पाहता या दवकणांना
रेशमाचे पाश रुळती
तो कुठे अन् मी कुठे
परी प्रीतऋतू मनी रोज फळती

व्हा दवांनो साक्षी तुम्ही
लोचने मिटुनी जरा
साखरेची झोप त्याची
चुंबिलेली ती उषा

मीलनाची वाढे गोडी
पहाटवेळी गारवा
ही हवा बघ चिंब ओली
श्वासामध्ये मारवा

शहारुनी येते ही काया
अंगी मदनाच्या खुणा
या दवांना काय सांगू
काय होते या मना

दि. ०३/०१/२०२१
सायं. ०६.१० वा.




## (८३)
## स्वप्नं उमलले

या घराच्या भोवताली
स्वप्नं माझे उमलले
रंग सारे पांघरूनी ते
फूल होऊनी डोलले

ही सुखाची थंड हिरवळ
दाटली सभोताली की
आणि सौख्याची हरित
वनराई पसरून गेली जी

झुळुझुळु वाहे प्रवाह
गीत गाऊन अंगणी
कस्तुरीचा गंध वाहे
सुरभी काही चंदनी

या फुलांच्या गुल्म दाटी
रंगी रंगुन बोलती
गुज माझे एकमेकींच्या
मनी जणु सांगती

हे झरोके या घराचे
मोकळे किती मोकळे
दिलखुलास हे सांगती ना
सृष्टीनाते आगळे

हा विसावा हा दिलासा
देह मन रमते इथे
घरकुलाच्या कोंदणातून
जन्म रेंगाळे इथे

दि. ३०/०१/२१
रात्री ०९.११ वा.



**(८४)**
**नभ रंग तू**

श्याम तुला शोधू कुठे
नभ रंग तू
पाहू कसे कुठे सांग
अंतरंग तू

हो प्रकाश निळा निळा
निळी सखोली
निळ्या अशा सावळ्या
हरीची बाधा झाली

घरी तोच दारी तोच
अंगणीही तोच
दूर कुठे जावे तरी
मनी वनी तोच

दिसे उघड्या दृष्टीला
म्हणून मिटून घेते
लोचनांच्या आतूनही
रूप तेच दिसते

व्यापला कणाकणात
काय जादू केली
रासरंगी गोपिकांची
एकात्म मने झाली

आजंही दिसे तो मला
पानापानातून
झाडीतल्या वाकलेल्या
कवडशातून

एक कवडसा आत
आलेला असे हा
बाहेर ना शोधू आता
आतची वसे हा

दि. ०४/०३/२१
०८.३१ वा.



(८५)
## रंग तबकडी नभ

निळ्या हिरव्या पिवळ्या
साऱ्या छटा मिसळल्या
रंग तबकडी नभ
चित्रकारे घुसळल्या

एक फटकारा ओढी
कुंचल्यातून आपुल्या
चित्र रोज मुक्त होई
देत प्रकाश सावल्या

नभ पिवळे धम्मक
डोंगराला नील कांती
हिरवी गडद झाडेही
तृण पोपटी पोपटी

पुष्कराज नभांगणी
राशी नीलम डोंगरी
पाचू हिरवे हिरवे
वृक्षांवरी भुईवरी

कधी वाटते वाटते
आकाशाला दुलईत
पितांबरी पांघरून
पहा झोपलेले इथं

पहाडांनी निळीशार
जाड कंबळ ओढली
अंग जाडं भरडं हे
आत भरली हुडहुडी

झालं वेली ताजी झाली
रंग तवाना अंगाला
हिरव्या रंगाच्या कुपीचा
नाही तुटवडा त्याला

थोडा फिका केला तोच
गवताला फासलेला
रंग देत थंड थंड
पायी राजाही चालावा

दिनमणी उगवता
मावळतीलाही रंग
केशराचे पिंप भरे
सारा रंगांचाच संग

रंग कळतील कारे
रंग प्यारे आणि न्यारे
काही नजरेत येती
काही आतून पसारे

मोरपिसारे पिसारे
रंग फुलातून द्या रे
रंगारंग जीवनाला
रंग भरून करा रे

दि. ०५/०३/२१
रात्री १०.१० वा.




(८६)

**स्वप्नं इथे थांबले**

स्वप्नं वाटते इथे थांबले
झाडांवरती थोडे
गुरफटून ते अधिकंच होते
गोड गुलाबी कोडे

कशी सोडली हिरवळ पाने
क्षणात या तरुराजे
रंग गुलाबी घे पांघरूनी
रूप वेगळे साजे

कधी वाटते सोडून द्यावे
तेच ते नियमित जगणे
कधी लिंपावे रंग वेगळे
भिन्न थोडे वागणे

पायवाट ही आपणच आपुली
सडा टाकुनी पहावी
रंग वेगळा शिंपडून त्या
प्रसादाशी न्यावी

मन प्रसन्न चित्त प्रफुल्लित
शृंगाराचा वसंत
अंतःकरणा अशी मिळू दे
लाडिक एक उसंत

तूही सोडून रंग तेच ते
रंग वेगळे घ्यावे
जीवनवाटेवरती माझ्या
फुले पेरूनी जावे

थकले मी रे काट्यांवरूनी
हासंत चालचालुनी
आता लाभू दे दुलई मऊमऊ
सुख दे तू अंथरुनी

तनमन माझे, मीही गुलाबी
तूही गुलाबी, स्वप्नं गुलाबी
दिशा गुलाबी, नजर शराबी
रंग गुलाबी, हास्य गुलाबी

स्वप्नं ठरू दे सत्य हे लोभस
सत्य स्वप्नं होऊ दे
कष्टंही माझे होत गुलाबी
विलयाला जाऊ दे

दि. १५/०३/२१
दुपारी १२.४५ वा.



## (८७)
## मरमर राबण्याची

माझ्या गावाची राखण
होते प्रेमाची माखण
लगबग कष्टण्याची
मरमर राबण्याची

अंगणात शेणाचा हा
केला मोठासा डोंगर
वर चढून पहारा
कुत्रा प्रामाणिक फार

नाही न्याहारी ही केली
सारी कामं झाली झाली
आता शेतात राबण्या
वेळ गडबड झाली

झोपडीत सारवण
शेण सुगंध पसरे
लख्ख भिंत नि जमीन
हाती पोतेरं चालते

चूल पेटवती माय
करी भाकर प्रेमानं
आधी अग्नी देवाला
मग गाय घास देणं

छतावर पाखरांना
एक भाकर टाकते
दुधामध्ये कुस्करून
ताटी माझ्याही वाढते

मग देते लेकराला
घरधण्याची काढून
ठेवे वेगळी आधीच
आलागेला ही राखून

असा उभा राहतो मी
शेणकुडाच्या डोंगुरी
गाव प्रेमळ मायाळू
त्याची येत नाही सरी

दि. १४/०३/२१
सायं. ०५.११ वा.




## (८८)
## मंजुळ सूर असे

चल चल जाऊ सकाळी थोडे
फिरूनिया येऊ
रम्य अशा या ताज्या ताज्या
हवेसे गे खाऊ

हिरवीहिरवीगार शेते ही
लवलवणाऱ्या पात्या
हिरवी झाडे हिरवी पाने
स्वप्नं हरित सांगत्या

खुले नभांगण खुली हवा ही
असे मोकळे गाणे
दोघे जाऊ सोबतीने अन्
छेडू सुरेख तराने

जरा टेकू या खुड बुंध्याशी
कुंपण तारांवरी
पाहू जोडीने चित्र सुरम्य
पैलतीराच्या वरी

रंग सारखे रूप सारखे
चित्र असे देखणे
जिथे जोडीने जातो आपण
मनास आकर्षिणे

चल चल राणी प्रभातगाणी
मंजुळ सूर असे
निवांत बसणे प्रसन्न असणे
जगणे सुंदर दिसे

दि. १७/०३/२१
सकाळी १०.२३ वा.



## (८९)
## नदी खळखळ वाहे

निळ्या आभाळाची माया
नदी खळखळ वाहे
चैतन्याची एक लाट
अंगी सळसळताहे

सर्ग निसर्ग विसर्ग
देत जाणे व्रत एक
हिरव्या झाडीतली छाया
मना विरंगुळा नेक

डोंगरांनी पांघरला
रंग विशाल नभाचा
गगनात छटा आल्या
पिंजलेल्या कापसाच्या

हिरवी हिरवाई साडी
निळीशार झालरही
मध्ये वर्ण श्वेत वाहे
नदी शृंगारली काही

कशी लाजली लाजली
मान मुरडून गेली
वळणावळणाला वळली
नागमोडी चाललेली

आज सरिता न रिती
प्रेम चिंब भिजलेली
उसळत्या लाटांतून
प्रीत गीत गायलेली

असा सुखद सुखद
पट रंगवीत गेला
कोण चित्रकार तिथे
कल्पनेत रंगलेला

कित्ती रंग त्याच्यापाशी
अशा छटांची संगती
हरी मोहतो श्रीहरी
रंग होत मोरपिशी

दि. २३/०३/२१
रात्री १०.११ वा.



## (९०)
## अशी एक सांज

अशी एक सांज
सारे रंग सोडते
सोनपिवळ्या रंगाचा
शृंगार मांडते

ते तिचे रुपास तिच्या
सोने मढविणे
रंगाला उजळवुनी ते
नभी चढविणे

थकलेल्या दिनकरास
देई निरोपा
तोही मालवून जाय
देख त्या रूपा

येई हळुवार नभी
चंद्र राजस
सजलेली सांज होय
किती तेजस

दीप पेटतील घरी
सांज बहरण्या
कुंपणे न घाला आता
मना विहरण्या

दि. ०८/०४/२१
०६.२१ वा.



## (९१)
## मनी सणाचा गोडवा

जीव इवला इवला
जीव कोवळा कोवळा
अंकुरल्या बीजातून
कोंब ताजा डोकावला

त्याची नाजूकशी पाती
डोळे घट्ट झाकलेली
नवं जग दडलेली
वर रूपाची नवेली

आली ताकद कुठून
जीव अणु एवढाच
दव अंगी झेललेला
त्याच्या जिवा एवढाच

अशी शक्ती आत आहे
झाड सामावून जाये
मोती जगण्यातले हे
दव समजून घ्यावे

व्हावे चिंब ओले त्यात
प्रीत प्रेरणा ही आत
भरू विश्वास इतुका
करू संकटी या मात

नवे वर्ष नवा जन्म
नवे रूप नवे स्वप्नं
पुन्हा नव्याने कोवळ्या
राहू पातीमध्ये दंग

नवे अंकुर फुटू दे
मनी सणाचा गोडवा
सारे ऐश्वर्य दवाचे
तुम्हा देऊ दे पाडवा

दि. १३/०४/२१
सकाळी ११.२१ वा.



## (९२)
## चित्रस्वर हे रंगती

भास हे आभास सुंदर
सावल्यांच्या बंदिशी
तो अडकतो दिनमणीही
स्वेच्छेने जणू त्या निशी

संध्यासमयी परत निघता
कोणी वाजवली गिटार
छेडिली अन् काळजाची
कोणी प्रीतीने ही तार

हाती ना येतो कधी हा
दिड.मणी सदा व्यस्तसा
आज झाला बंदीवासी
समय जरी तो अस्ताचा

वृक्षराजी जलतीरावर
सावल्यांची सोबत
झडती सप्तही सूर येथे
संध्याकालीन नौबत

क्षितिजंही उतरून आले
मध्यभागी मैफिल
सूर्य अतिथी या सभेचा
कोणी नाही गाफिल

ऐकुनी ते गाण सुंदर
रेंगाळे थोडी निशा
चांदवाही थबकला की
विसरला स्थाना दिशा

जलतरंगांनी दिलेली
साथ सोबत एरवी
छान झाली सांगताही
सूर्य गायी भैरवी

जादू ही संगीत ऐशी
सारे विसरून दंगती
अन निसर्गातून दिगंती
चित्रस्वर हे रंगती

दि. २०/०४/२१
सकाळी ०८.१४ वा.




**(९३)**

**हासलेले मोती वेच**

अस्सं अंगण अंगण
मन घालतं रिंगण
ऋतू ओघळत येती
त्यांचं चैतन्य सांगणं

सारी हिरवाई नांदं
पाचू भरलेलं झाड
हिरवा चुडाही हातात
शेत हिरवंच ग्वाड

आली नेसून लुगडं
हिरवं इरकल बघ
चोळी अंगावर शोभं
रूप सालस ते तिचं

तिचा वावर घरात
अंगणात खुशी पडं
असं संसाराचं सुख
हाती सोनुली बागडं

छकुलीनं घातलेलं
देख परकर पोलकं
साध्या सुध्या संस्कृतीचं
चित्र कित्ती हे बोलकं

ओसंडून वाहतीया
खुशी मुखड्यावरून
जिथं मायलेकी खुश
घ्यावा आनंद जाणून

हासलेले मोती वेच
कळ्या सुखाच्या अमाप
पायघड्या सृष्टी संग
ये ना अशीच चालत

असं फुलतं ऱ्हाऊ दे
माझं घर नि अंगण
भर उन्हात पडू दे
माझ्या अंगी हे चांदणं

दि. २२/०४/२१
रात्री ११.४७ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), अळुमाळु (फुले), सुरभी (फुले), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर (त्याच्यावरील प्रीत कविता), सृष्टीगंध (निसर्गपर) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (वेळा) - तेव्हा, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, नभ मोजताना, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) - प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com//lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/?utm_source=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम - ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम - ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग - १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग -२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ७६
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : २७
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •